बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७५ वा ।शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### दुकानातून सोन्या चांदीचे दागिण्याची चोरी

परंडा (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी गणेश चंद्रकांत कवटे, वय २५ वर्षे, रा. रुई ता. परंडा जि. धाराशिव यांचे गणेश ज्वेलर्स नावाचे सोन्याचे दुकानाचे शटरचे सेंटर लॉक अज्ञात सात व्यक्तीने दि.१६.०९.२०२५ रोजी फरशीतुन उचकटुन व शटरचे साईड लॉक पट्टी कट करुन आत प्रवेश करुन सोन्या चांदीचे दागिने व सि. सि. टी व्ही डिव्हीआर असा एकुण ७४,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– गणेश कवटे यांनी दि.१६.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (४), ३०५(ए), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### घरातील सोन्या चांदीचे दागिण्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)– आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दिलीप श्रीधरराव कावळे, वय ६६ वर्षे, रा. समता नगर ता. जि. धाराशिव राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१५.०९.२०२५ रोजी १८.१५ ते दि. १६.०९.२०२५ रोजी १४.३० वा. सु. तोडून आत प्रवेश करुन घरातील सोन्या चांदीचे दागिने असा एकुण ६९,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– दिलीप कावळे यांनी दि.१६.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथे घरासमोरुन मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)– शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अविनाश केरबा गायकवाड, वय ६ शांतीदुत नगर हनुमान चौक धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल क्र अविनाश गायकवाड यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– धाराशिव शहर यांनी दि.१७.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅक्टर खाली आडकून एकजण गंभीर जखमी होवून झाल मयत

शिराढोण (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गतमयत सतीश महादेव गवळी, रा. घुटेनगर मुरुड ता. जि. लातुर हे दि.१६.०९.२०२५ रोजी . त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर चालवून अंकीत अनिल नाडे यांचे पाडोळी शिवारातील शेताजवळ ट्रॅक्टर घसरुन ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटून ट्रॅक्टर रोडलगतच्या नाल्यात पडल्याने त्याचे खाली आडकून सतीश गवळी हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– उत्रेश्वर सतीश गवळी, रा. घुटेनगर मुरुड ता. जि. लातुर यांनी दि.१७.०९.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# उपळा (मा.) येथे स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र लवकरच सुरू करणार-पालकमंत्री सरनाईक

### मराठवाडा मुक्तीसंग्रामात उपळा (मा.) गावचे विशेष योगदान



धाराशिव, (जिमाका) – मराठवाडा मुक्ती संग्रामात धाराशिव जिल्ह्यामध्ये उपळा (मा.) गावचे विशेष योगदान आहे.या गावातील स्वातंत्र्य सैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात सक्रीय सहभाग घेतला.त्या सर्वांना आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या वर्धापन दिनी अभिवादन करतो,असे प्रतिपादन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. उपळा गावातील तरूणांच्या मागणीनुसार स्मृती स्तंभाजवळ लवकरच स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र सुरू करण्यात येईल,अशी ग्वाही देत जिल्हा प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही पालकमंत्री सरनाईक यांनी केल्या.

धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) येथे रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामस्तरीय ग्रामसभा शुभारंभ कार्यक्रम पार पडला. यावेळी पालकमंत्री सरनाईक बोलत होते.याप्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा पोलिस अधीक्षक रितू खोखर, उपळ्याचे सरपंच सुहास घोगरे, उपसरपंच विकास पडवळ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, आदींसह सर्व ग्रामस्थांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

पालकमंत्री म्हणाले,संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासासाठी जागतिक परिवर्तन कार्यक्रम २०३० जाहीर केलेला आहे. सर्वांना सोबत घेऊन चला हा या कार्यक्रमाचा गाभा आहे. संयुक्त राष्ट्र संघाने १७ शाश्वत ध्येय व त्या अंतर्गत १६९ कलमे यानुसार लक्षीय उद्दीष्टे जाहीर केलेले आहेत. २०१६ पासून आपल्या देशात याची अंमलबजावणी सुरू आहे.देशाच्या पंचायतराज विभागाकडून ग्रामविकासासाठी शासनाचे विविध विभाग कार्य करत आहेत.त्यातूनच गावचा विकास करण्यावर शासन अधिक भर देत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते किणगाव (जि. छत्रपती संभाजी नगर) येथून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ झाला,याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे आदींचे याप्रसंगी मी अभिनंदन करतो,असेही पालकमंत्री सरनाईक म्हणाले.

अभियाना अंतर्गत गावचा विकास करण्यावर शासनाचा अधिकभर असणार आहे.अभियानांतर्गत सुशासन पंचायत,गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण,लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे,जल समृद्ध,स्वच्छ व हरित गाव,मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण,सक्षम पंचायत, उपजीविका विकास,सामाजिक न्याय ही अभियानाची मुख्य घटक असून यातून सशक्त पंचायत आणि समृद्ध महाराष्ट्र घडण्यास मदत होणार असल्याचेही पालकमंत्री सरनाईक यांनी सांगितले.

सुरूवातीला गावातील स्मृती स्तंभ येथे पालकमंत्री सरनाईक यांनी पुष्पचक्र अर्पण करून स्वातंत्र्यसैनिकांना वंदन केले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. पालकमंत्री सरनाईक यांचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी स्वागत केले.

## श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव २०२५ साठी आरोग्य विभाग सज्ज

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)– श्री शारदीय नवरात्र महोत्सव २०२५, तुळजापूर, दिनांक २०/०९/२०२५ पासून सुरु झाला असून राज्यातून व परराज्यातून भाविक भाविक व पायी यात्रेकरू चालत तुळजापूर शहराकडे, लातूर रोड,धाराशिव रोड, सोलापूर रोड, नळदुर्ग रोड, लोहारा रोड व कर्नाटक उमरगा रोड या मार्गाने भाविक दाखल होत आहेत. भाविकांना आरोग्य सुविधा देणे साठी आरोग्य विभागामार्फत स्पेशिलीस्स्ट डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी असे एकूण १००० मनुष्यबळ मार्फत आरोग्य विभागाने २४ **७ खालील आरोग्य प्रमाणे सुविधा देण्यात येत आहे.**

प्रथमोपचार केंद्रे (२२) – तुळजापूर कडे येणाऱ्या प्रत्येक मार्गावर २४ तास २२ आरोग्य पथके कार्यान्वयित करण्यात आलेली आहेत, प्रथमोपचार केंद्रावर ०१ आरोग्य कर्मचारी व एक आशा स्वंय सेविका औषध साठ्यासह आरोग्य सेवा देणार आहे.

प्रथमोपचार केंद्रे तुळजापूर शहर (१३) – तुळजापूर शहरामध्ये १३ प्रथमोपचार केंद्र कार्यान्वयित करण्यात येणार आहेत, प्रथमोपचार केंद्रावर ०१ वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी स्वय सेविका औषध साठ्यासह आरोग्य सेवा देणार आहे.

साथरोग प्रतिबंधात्मक पथके (२०) – यात्रा मार्गावर १० (ग्रामीण) साथरोग प्रतिबंधात्मक पथके व शहरी भागात १० पथके नियुक्त. प्रत्येक पथकामध्ये ०१ आरोग्य सहाय्यक व ०१ आरोग्य सेवक यांचा समावेश. पथकाद्वारे यात्रा मार्गावरील व शहरातील सर्व पाणी स्रोत व पाणीसाठे, हॉटेल, धाबे, लॉज इ. ठिकाणचे पाणी तपासणी व शुद्धीकरण. फिरते आरोग्य पथक (Bike Ambulance) (१० टीम) – तुळजापूर शहराकडे येणाऱ्या एकुण ०६ मार्गावर ३ शिफ्ट मध्ये इळज्ञश Ambulance कार्यरत आहेत. रुग्ण वाहिका (२५) – यात्रा मार्गावर २४ *७ सेवेसाठी प्रा.आ.केंद्र स्तरावरील (१०२) च्या १२ व तुळजापूरशहरात

१०८ च्या १३ रुग्ण वाहिका कार्यरत आहेत. आय.सी.यु. सेंटर (०२) – तुळजापूर शहरामध्ये यात्रा कालवधीत ०५ खाटांचे ०२ आय.सी.यु. बेड हॉस्पिटल स्पेशिलीस्स्ट डॉक्टर्स, सर्व औषधी व अत्याधुनिक उपकरणासह २४ तास सेवा देत आहेत.

आरोग्य दतदूत (१० टीम) – तुळजापूर शहरामध्ये प्रथमोपचार किट सह एकूण २० आरोग्य सेवक आरोग्य दूत म्हणून कार्यरत आहेत. शहरात व शहराच्या १ किमी अंतरामध्ये आरोग्य दूत प्रथमोपचार कीट सह पायी फिरती करून आरोग्य सेवा व आरोग्य विषयी जन जागृती करत आहेत. वॉर रूम (नियंत्रण कक्ष) – उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथे सनियंत्रण, अहवाल सादरीकरण ई. साठी २४*७ **वॉर रूम कार्यरत आहे.**

प्रसिद्धी साहित्य – यात्रा मार्गावर व तुळजापूर शहरामध्ये ठिकठिकाणी प्रसिद्धी साहित्य लावून आरोग्य विषयी

जनजागृती करण्यात येत आहे.

यात्रा कालावधीत सर्व भाविकांनी यात्रा कालावधीत आरोग्य शिबीर व आरोग्य सेवेचा सेवेचा लाभ घ्यावा

आवाहन श्री मैनाक घोष मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. धाराशिव, डॉ. एस.एल हरिदास जिल्हा आरोग्य अधिकारी व

डॉ.धनंजय चाकूरकर जिल्हा शल्य चिकीस्तक धाराशिव यांनी भाविकांना केले आहे.

## मुरूम शहरात विविध ठिकाणी ध्वजारोहण





मुरूम (रामलिंग पुराणे)– १७ संप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शहरातील विविध ठिकाणी ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. शहरातील मुरूम पोलीस स्टेशन येथे सहायक पोलीस निरीक्षक संदीप दहीफळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला यावेळी पोलीस कर्मचारी उपस्थित होते, प्रतिभा निकेतन विद्यालयात नगर शिक्षण विकास मंडळ सचिव व्यंकट जाधव गुरुजी यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला यावेळी प्राचार्य उल्हास घुरघुरे, प्रयवेक्षक विवेकानंद परसाळगे, राधाकृष्ण कोंढारे आदिसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील डॉ. आंबेडकर शहर वाचनालय प्रांगणात सचिव प्रा. अण्णाराव कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला यावेळी सह सचिव महेंद्र कांबळे, सिद्धार्थ भालेराव, राहुल गायकवाड,चंद्रकांत गोडबोले, अमोल गोडबोले, प्रा. नागनाथ बनसोडे,सूरज कांबळे,निर्मलकुमार लिमये जिल्हा परिषद स्पेशल शाळा शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगर परिषद कार्यालयावर मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडला यावेळी शहरातील नागरिक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सभागृहावर बसव प्रतिष्ठान अध्यक्ष तथा समाजसेवक डॉ. रामलिंग पुराणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी भगवान बनसोडे, शेषेराव सरवदे, राजेंद्र धनशेट्टी, सुभाष बनसोडे, दत्ता कांबळे, शंकर तरंगे, किरण देडे, किशोर देडे, माजी सैनिक तुळशीराम देडे आदी उपस्थित होते.

## भूम पंचायत समिती कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेने घेतले ताब्यात

### पैशाच्या मोबदल्यात केला होता हल्ला

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)– दि०९/०९/२०२५ रोजी सायंकाळी मौजे ईट शिवारातील ईट ते जातेगाव जाणारे रोडवर किनारा हॉटेलचे जवळ श्रीकृष्ण अर्जुन बांगर वय ३९ वर्ष व्यवसाय नोकरी रा. पाटोदा ता. पाटोदा जि. बीड व त्यांचे सहकारी रविन्द्र राख त्यांचे बोलेरो गाडी मध्ये जात असताना गाडी थांबवण्यास सांगुन अनोळखी चार इसमांनी जिवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण करून जखमी केले.अशा मजकुराच्या फिर्यादी जबाबावरून पो.स्टे. वाशी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान पोलीस अधीक्षक श्रीमती. रितू खोकर मॅडम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सदर गुन्ह्याचा तपास करून नमूद गुन्हा उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक यांना माहितीदाराकडून यातील संशयित आरोपी बाबत माहिती मिळाली. त्यांनी सलमान पठाण, रा. भूम व रितेश अंधारे, रा. हाडोंगरी यांना येरमाळा उड्डाणपुलाच्या खालून ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्या संदर्भात अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देऊन त्यांचे अन्य साथीदारांची माहिती दिली. तसेच पैशाच्या मोबदल्यात सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले. त्यावरून वर नमूद दोन आरोपींना वैद्यकीय तपासणी करून पुढील कारवाई कामी पोलीस ठाणे वाशी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर मा. अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन कासार,पोलीस हावलदार शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, दयानंद गादेकर,चालक पोलीस अंमलदार नागनाथ गुरव, रत्नदीप डोंगरे, प्रकाश बोईनवाड यांचे पथकाने केली आहे.

## शहरातील स्वराज्य ध्वज स्तंभाचे भूमिपूजन

धाराशिव (जिमाका)– शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात १५१ फूट उंचीच्या स्वराज्य ध्वज स्तंभाचे भूमिपूजन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत आज पार पडले. धाराशिव नगर परिषदकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाचे पालकमंत्री सरनाईक यांनी कौतुक केले.हा अतिशय चांगला उपक्रम असल्याचेही ते म्हणाले.यावेळी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे,मनोज जरांगे-पाटील आदींची उपस्थिती होती. सुरूवातीला पालकमंत्री सरनाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


## मुरूम शहरात विश्वकर्मा पूजन दिन सोहळा उत्सहात संपन्न, विराट विश्वकर्मा संघटनेचा पुढाकार



मुरूम (रामलिंग पुराणे)– येथील विराट विश्वकर्मा संघाच्या वतीने दि. १७ वार बुधवार रोजी मुरूम येथील अशोक चौकातील महादेव मंदिरात प्रभू विश्वकर्मा पूजन व कामगार दिन उत्साही वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी वीरक्त मठ उत्सुरीचे मठादीपती कोरणेश्वर महास्वामी यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाची उदघाट्न संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजी पांचाळ तर जिल्हा अध्यक्ष परमेश्वर सुतार, ब्रम्हकुमार राजूभाई भालकटे,ब्रम्हकुमारि सरिता बहीणजी, जिल्हा उपाध्यक्ष धनराज पांचाळ, जिल्हा सचिव संदीप पांचाळ, पाणी पुरवठा अभियंता पवनकुमार सुतार आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन, द्विपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरानी मनोगतपर मार्गदर्शन केले.

यावेळी शहर परिसरातील उपस्थित समाजबांधवाचा सन्मान करण्यात आला. मुरूम शहर अध्यक्ष गोविंद महामुनी, उपाध्यक्ष लक्ष्मण पांचाळ, सचिव परमेश्वर पांचाळ, प्रमुख मार्गदर्शक दिलीप पांचाळ, कार्यकारिणी सदस्य महादेव महामुनी, सदस्य विवेकानंद महामुनी, बाबू सुतार, संजू सुतार, अमोल पांचाळ, शिवा सुतार,मोनप्पा सुतार आदींनी परिश्रम घेतला, महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता संपन्न झाली.

## प्रा.अरुणा पोटे यांना मुक्ता साळवे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



धाराशिव (प्रतिनिधी)– येथील रहिवाशी असलेल्या आणि आर्टस् न्ड कॉमर्स कॉलेज, करेपूर येथे वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या सुप्रसिद्ध लेखिका प्रा. अरुणा गंगाराम पोटे यांना दि इंग्लिश एज्युकेटर्स सोसायटी अंबाजोगाई यांच्याकडून दरवर्षी दिला जाणारा मुक्ता साळवे राष्ट्रीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.

त्या शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करत असल्यामुळे त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे असे दि इंग्लिश एज्युकेटर सोसायटीचे संस्थापक प्रा.डॉ.रमेश लांडगे यांनी म्हटले आहे.

प्रा. अरुणा पोटे यांनी Problem and prospects of women entrepreneur in Aurangabad district या विषयावर यशस्वी संशोधन केले आहे. या संशोधनासाठी त्यांना राजीव गांधी नॅशनल फेलोशिप देखील प्राप्त झालेली होती. त्यांना कोल्हापूर येथे २०१७ मधील फातिमा शेख आदर्श शिक्षिका पुरस्कार देखील प्राप्त झालेला आहे. त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनेक क्रमिक पुस्तकांचे लेखन देखील केलेले आहे. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधणेबंधाचे लेखन आणि सादरीकरण केलेले आहे. त्यांनी अनेक महाविद्यालयामध्ये बँकिंग आणि स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन केलेले आहे. याबद्दल त्यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते ६ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनामध्ये वितरित करण्यात येणार आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज , कडेपूरचे प्राचार्य डॉ.एल .जी जाधव यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## रोजगार निर्मितीचा, पहिला विचार करा

राज्यात वरचेवर अनेकजन अविचाराने चालत असल्याने काही चुका होण्याची शक्यता आहे. आरक्षणाची मागणी सर्वत्र जोर धरत आहे. आरक्षण मिळाले पाहिजे. त्याचा लाभही मिळाला पाहिजे. आरक्षणामागील उद्देश समजाऊन घेतला पाहिजे. मुळात आरक्षणापुर्वी असाही विचार केला पाहिजे की, रोजगाराची संधी उपलब्ध कशा प्रकारे होऊ शकेल. कोणत्या कारणामुळे रोगगाराची निर्मिती होईल. वास्तविक गेल्या दहा वर्षात रोजगारची निर्मिती किती केली गेली याचा विचार होणे अपेक्षित आहे. मुळात वरचेवर रोजगाराची उपलब्धता कमी दिसून येते. त्याच प्रमाणे देशात लॉकडाऊन नंतर जी परिस्थिती निर्माण झाली तेंव्हा पासून रोजगाराच्या संधी कमी झाल्या. हजारोंच्या संख्येन इंजिनियर तयार होत आहेत. हजारोंच्या संख्येने उच्चशिक्षित होत आहेत. आज बेकारांची संख्या वाढती आहे. शिक्षण घेवुन बाहेर पडणाऱ्याची संख्या पाहिली तर मोठी आहे. तसे पाहिले तर शासकिय नोकऱ्यातरी सरकार कोणाकोणाला देणार! मुळात व्हॅकंन्सी कमी आहे. अनेक कामे संगणक करीत आहे. मानवाची गरज अनेक ठिकाणी अल्प दिसून येत आहे. विज्ञानाने जशी प्रगती केली तसे नुकसानही केले आहे. वरचेवर बे-रोजगाराची संख्या वाढती आहे. ती कमी होण्याचे नाव घेत नाही. त्याच प्रमाणे खाजगी कंपन्यातसुद्धा नोकराची कटोती करताना दिसून येत आहे. ज्या ठिकाणी औदयोगिक वसारत आहेत तेथे अनेक कारखाने बंद आहेत. जे चालू आहेत तेथे मर्यादित जागा उपलब्ध होतात. मुळात बेरोजगारची संख्या वाढती आहे व रोजगाराची उपलब्धता कमी आहे. मोठ्या शहरात कामा निमित्त येणारे लोंढे थोपणे आवघड आहे. अधिक शिकलेली मंडळी शेतीत काम करण्यात लाजते आहे. मुळात शिक्षण हे सर्वसमावेश असले पाहिजे. सगळ्यांना सवलती दिल्या तर नोकऱ्या कशा मिळतील. पहिल्यांदा नोकऱ्या निर्माण कराव्यात. किती नोकऱ्या उपलब्ध आहेत. दरवर्षी किती नोकऱ्या उपलब्ध होतील. त्याच प्रमाणे दरवर्षी सेवानिवृत्तीची संख्या किती असेल याचा अभ्यास पहिल्यांदा केला पाहिजे. केवळ सध्याला मागणेच चालू आहे. मागणी मागावी मात्र त्याच फायदा किती होतो किंवा झाला आहे याचा विचार केला पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, अनेकांचे सरकारी नोकरीचे वय निघून गेले आहेत. अनेक पदव्या आहेत. तरी नोकरी नाही. मुळात नोकऱ्याच नाहीत तर देणार कोठून? त्यामुळे पहिल्यांदा नोकऱ्याचा उपलब्ध केल्या पाहिजेत. आज पहिल्याच्या वर्गात मुलास शाळेत प्रवेश द्यावयाचा झाला तर किती पैसा मोजावा लागतो. ते जनसामान्यांना परवडत नाही. शिक्षण सर्वात महाग झाले आहे ते सर्वांना शिक्षण मोफत केले पाहिजे. दवाखान्याचा खर्च परवडणार नाही या बाबत विचार केला पाहिजे. मुळात आपण बऱ्याच वेळा विचार करीत नाहीत. जागाच शिल्लक नसतील तर नोकरीची भरती करा असे म्हणणे संयुक्तित वाटत नाही. नोकरीची मागणी केली जाते ती केली पाहिजे. त्या अगोदर नोकरीसाठी जागा शिल्लक किती आहेत. याचा विचार केला जात नाही. आरक्षण दिले, नोकऱ्याच नाहीत. शिक्षणाचे जवळपास खाजगीकरण झाल्यात जमा आहे. खाजगी शिक्षण संकुलात मोफत प्रवेश दिला जात नाही. मोठ्या प्रमाणात डोनेशन मागीतले जाते. यावर निर्बंध आणले पाहिजेत. खाजगी शिक्षण व सरकारी शाळेत शिक्षणातील तफावत दिसून येत असल्याने पालकांचा कल कोणाकडे असतो. याचा विचार केला पाहिजे. मागणी मागण्या अगोदर त्याचा लाभ झाला पाहिजे. शहाणी मंडळी असाला तर पहिल्यांदा आरोग्य व शिक्षण मोफत करावे तेही सक्तीने! आपोआप अनेक प्रश्नाची सोडवणुक होते. केवळ मागणी मागणे चालू आहे. कोणीही उठावे मागतच राहावे. आज आंदोलने करतात त्यांनी पहिल्यांदा गत चारवर्षात किती नोकऱ्या आपल्या समाजाला मिळाल्या. आपल्या समाजात शिक्षणाचे प्रमाण किती लाभले. सध्याला नोकऱ्याच उपलब्ध किती दिसून येत आहेत. एमआयडीसीमध्ये गरजवंतास उद्योगासाठी जागा मिळत नाहीत अनेक कारखाने नावाला आहेत मग रोजगार कसा उपलब्ध होणार. राज्यातील बेरोजगारी कशी दुर होणार याबाबत चिंतन झाले पाहिजे. मुळात काही बाबी चुकीच्या दिसून येत आहेत. नेते किंवा पुढारी मंडळींनी आंदोलने केल्यास यश मिळेल असेच करावे. त्यापेक्षाही कितीजणास लाभ होईल किंवा पुर्वी झाला आहे या बाबत चिंतन करावे. अनेकांचे वय निघून गेले आहेत. एकतर नोकरी नाही दुसरी गंभीर बाब लग्न ही नाहीत. अशा दुहेरी संकटात सापडले आहेत. याबाबत चिंता कधी व्यक्त करणार? आज जीवन संपविणारे पुढे येत आहेत. निराशाच्या माध्यमातून जीवन संपवित आहेत. त्याच प्रमाणे काय होत आहे मागीतले तर दिले जात आहे. मात्र देणाऱ्यांना काही बाबी माहिती असाव्यात मगच दिले म्हणजे नोकरीची हमी आहे का? शिक्षणात, शिक्षण सम्राट मोफत प्रवेश देतात का? पहिल्यांदा नोकरीसाठी जागा रिकाम्या किती आहेत ते शोधावे. किती जणास लाभ झाला याचा विचार करावा. आज परिस्थिती सर्वच समाजाची अशी आहे की, नोकरीचे वय निघुन जात आहे याचा नेते-पुढारांनी विचार केला पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, शेतात कामाला माणूस मिळत नाही. आपले नेते ईस्त्राईल, अमेरिकेचे शेती उत्पनाचे उदा. देतात. भारतात मोठ्या प्रमाणात उत्पन्न का होत नाही. एकारात पन्नास-साठ कट्टे सोयाबिनचे परदेशात होतात भारता का नाही? मुळात आपल्या देशात विद्वानाची कमी नाही मात्र योग्य मार्गदर्शन मिळत नाही. चुकीच्या पद्धतीचा आवलंब होतो. योग्य पद्धतीचे ज्ञान मिळत नाही. उदा.मात्र परदेशातील दिले जाते. त्यामुळे आता प्रत्येकांनी विचारपुर्वक चालले पाहिजे. कोणी काही म्हणत असेल तर पाहिल्यांदा ते योग्य आहे का नाही याचे चिंतन करावे. सध्याला काळ हा स्वार्थीची पोळी भाजून घेणारा आहे. त्यामुळे पहिला विचार रोजगार निर्मितीचा करावा. रोजगार, नोकऱ्याच नसतील तर काय करावे याबाबत स्वत: चिंतन करून चालले तरच योग्य नसता आंधारात चापचत पडल्यासारखी स्थिती निर्माण होण्यात वेळ लागणार नाही.

# मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा, पाणंदरस्ते, घरकुलांचा प्रश्न मार्गी लागणार

## आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांची माहिती



**धाराशिव/रामेश्वर डोंगरे :** आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपतर्फे सेवा पंधरवडा राबवण्यात येणार आहे. याअंतर्गत पाणदरस्ते मोकळे करणे, मंजूर घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देणे, आदी उपक्रम राबवले जाणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशनचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी साजरा झाला. यानिमित्त सेवा पंधरवडा राबवणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे. या सेवा पंधरवड्यात धाराशिव जिल्ह्यासह राज्यभरात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. याबाबतची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

पाणंदरस्ते मोकळे करण्यात येणार आहेत. राज्यभरात हजारो किलोमीटरच्या पाणंदरस्त्यांची कामे केली जाणार आहेत. या कामांत काही अडचणी आल्या तर त्या सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची मदत घेतली जाणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांसह सर्वच जण पूर्ण क्षमतेने हे काम करणार आहेत. या सेवा पंधरवड्यात पहिल्या पाच दिवसांत पाणदरस्त्यांची कामे हाती घेतली जाणार आहेत, असे आमदार पाटील यांनी सांगितले.

त्यानंतरच्या पाच दिवसांत मंजूर घरकुलांच्या कामांकडे लक्ष दिले जाणार आहे. मंजूर झालेल्या घरकुलांना जागा उपलब्ध करून देणे, २०११ च्या आधीचे पुरावे असलेल्या सर्वांनाच गावठाणात किंवा गायरानात जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यानंतर आरोग्यसेवा, स्वच्छता आदी उपक्रम राबवले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**रेल्वेच्या कामाला गती, धाराशिवला जंक्शन होणार**

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये घोषणा केली होती. आता हे काम धडाक्यात सुरू आहे. धाराशिवला रेल्वेचे जंक्शन केले जाणार आहे. हा रेल्वेमार्ग कार्यान्वित झाल्यानंतर अर्थकारणाला मोठी गती मिळणार असून, त्यामुळे जिल्ह्याचा कायापालट होणार आहे. आदरणीय पंतप्रधान मोदी साहेबांनी आपल्या जिल्ह्यासह राज्यातील विकासकामांसाठी मोठे सहकार्य केले आहे. मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली देशात, राज्यात विकासाची घोडदोड सुरू आहे. त्यात आपण कुठेही मागे राहू नये, यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

# महाराष्ट्र महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित महाराष्ट्र महाविद्यालय मध्ये वृक्षारोपण




**निलंगा/प्रतिनिधी :**येथील महाराष्ट्र महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये संघटनेच्या वतीने २८ बॉटल पाम वृक्षाची लागवड करण्यात आली. माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने आयोजित वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कर्मवीर कदम सर ,माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. डॉ गजेंद्र तरंगे सर, सचीव श्री कुमोद लोभे, उपाध्यक्ष प्रा. दत्ता शाहीर सर, कोषाध्यक्ष प्रा. शत्रुघ्न थोरमोटे, संघटक श्री वैभव पाटील, सदस्य प्रा. अरुण चव्हाण, सौ. शैला देशमुख, माजी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

वृक्षारोपण उपक्रमासाठी उपप्राचार्य डॉ भास्कर गायकवाड, डॉ डी एस चौधरी माजी विद्यार्थी समितीचे समन्वयक डॉ सुभाष बेंजलवार, प्रा. संदिप सुर्यवंशी, प्रा. धनराज किवडे, ग्रंथपाल प्रा. मिनाक्षी बोंडगे, क्रिडा संचालक डॉ. गोपाळ मोघे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ, विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरुद्र बदनाळे, एनसीसीचे केअरटेकर ऑफिसर डॉ. सचीन बसूदे, व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# उजनी येथे पुरामुळे झालेल्या नुकसानीची पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली पाहणी

**नदीवर पूल उभारणीसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना**



**लातूर/प्रतिनिधी :** तेरणा नदीला आलेल्या पुराने उजनी येथील शेतपिके, घरांचे आणि रस्त्यांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पाहणी केली. पुराच्या पाण्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. तसेच तेरणा नदीवर उजनी गावाजवळ पूल उभारण्यासाठी प्रस्ताव सादर करावा, असा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ, उपअभियंता रोहन जाधव यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.

नदीला आलेल्या पुरामुळे शेतीचे झालेले नुकसान, नदीकाठावरील घरात पाणी जावून झालेली पडझड, रस्त्यांचे नुकसान आदी बाबींची पालकमंत्री श्री. भोसले यांनी पाहणी केली. तसेच याठिकाणी उपस्थित ग्रामस्थ, शेतकरी यांच्याकडून नुकसानीची माहिती जाणून घेतली. तसेच उजनी गावाजवळ तेरणा नदीवर पूल उभारण्यासाठी नाबार्डकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच महामार्गाच्या पुलाची वाढविण्याचे काम लवकरात लवकर सुरु करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा ऐतिहासिक निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची अनेक पशुपालकांबरोबरच राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी या मागणीला सकारात्मक पाठिंबा दर्शविला आणि पावसाळी अधिवेशनात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा लोकाभिमुख असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठ्या कृषिप्रधान राज्यांपैकी एक आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के लोकसंख्या थेट शेतीवर आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतीसोबतच पशुपालन हे देखील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७६.४१ लाख पशुपालक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, वराहपालन व तसेच पशुपालनाशी निगडित मूल्यवर्धित प्रकल्प यांसारख्या व्यवसायांना आता कृषी क्षेत्रातीलच सवलती व लाभ मिळणार आहेत.

**पशुपालन हे सामाजिक स्थैर्याचेही आधार**

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकरी हा तिचा कणा मानला जातो. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे, जे भारताच्या ११.६ टक्के पशुधनासह जगाच्या पशुधनात मोठा वाटा उचलते. ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे, त्यामुळे पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढी-शेळी पालन यासारखे व्यवसाय केवळ आर्थिक स्रोत नसून सामाजिक स्थैर्याचेही आधार आहेत.

पशुपालनातून मिळणारे नियमित उत्पन्न हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या भागांमध्ये पशुपालनाचा प्रसार अधिक आहे, तेथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ७९ टक्क्यांनी घटल्याचे निदर्शनास आले आहे. याच कारणास्तव केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त भागात एकात्मिक शेती प्रणाली, मत्स्य व पशुपालन पॅकेज लागू केले आहे.

केंद्रीय कुक्कुट संशोधन संस्था (आयसीएआर), च्या संशोधनानुसार, १.२५ हेक्टर जमिनीवर एकात्मिक शेती प्रणालीद्वारे सुमारे ५८,३६० रु. उत्पन्न आणि ५७३ दिवस रोजगार मिळतो. यातूनच शेतीसोबत पशुपालन केल्यास आर्थिक व सामाजिक स्थैर्य साधता येते, हे समोर आले आहे.

**कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा २४ टक्के वाटा**

महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमाकांचे कृषिप्रधान राज्य आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन, मत्स्यपालन तसेच फळफळावळ-भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. कृषी हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जे राज्याच्या अंदाजे ५० टक्के लोकसंख्येला रोजगार देते. महाराष्ट्रातील कृषीक्षेत्र हे ७-८ टक्के दराने वाढले आहे. महाराष्ट्राचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ८-९ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्याचा भारतातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा अंदाजे १३ टक्के आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये ''कृषी व संलग्न'' या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) अवघ्या सहा जिल्ह्यांचा ५६ टक्के वाटा असून उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा केवळ ४४ टक्के आहे. ही असमतोल स्थिती दूर करण्यासाठी पशुपालन हा आर्थिक समावेशनाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

दुग्ध व्यवसाय, मेंढी-शेळी पालन आणि कुक्कुटपालन या व्यवसायांतून केवळ शेतकरीच नव्हे, तर संबंधित औषध, खाद्य, सेवा पुरवठादार कुटुंबांनाही उपजीविका मिळते. राज्यात १९५ लाख गोवंशीय व म्हशी आहेत, तर सुमारे १ कोटी शेळ्या व २६ लाख मेंढ्या आहेत. हे पशुधन शेकडो कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कुक्कुटपालनातही राज्य अग्रेसर असून ७.४ कोटी पक्षी नोंदणीकृत आहेत.

**पशुपालन केवळ पूरक नव्हे, तर स्वतंत्र आधार**

गेल्या काही दशकांत कृषी उत्पन्नात होणाऱ्या चढ-उतारांमुळे अनेक शेतकऱ्यांनी पशुपालनाचा आधार घेतला. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुक्कुटपालन, डुक्कर पालन यासारख्या व्यवसायांनी शेतकऱ्यांच्या घरातील रोजचा खर्च भागवण्यास हातभार लावला आहे. दुग्ध व्यवसायातून निर्माण होणारे उत्पादन, अंडी, मांस, लोकर, शेणखत या सर्व गोष्टींना बाजारात वाढती मागणी आहे.

निती आयोगाच्या अहवालानुसार पशुसंवर्धनाचा जीडीपीतील वाटा ४ टक्के असून तो वाढवण्यासाठी नियोजनबद्ध गुंतवणूक व धोरण राबवणे आवश्यक आहे. २०३० पर्यंत भारतात दूध, अंडी, मांस यांची मागणी अन्नधान्यापेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे पशुपालनाला धोरणात्मक महत्त्व देणे अपरिहार्य होते.

सद्यःस्थितीत दूध, अंडी व मांस यांचे उत्पादन व उपलब्धता विचारात घेता सन २०३० पर्यंत दूध, अंडी व मांस यांची एकूण मागणी १७ कोटी टन इतकी असून सदर मागणी तृणधान्याच्या मागणीपेक्षा अधिक आहे. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधले असून त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषी व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणे हा महत्वाचा पर्याय होता. त्यामुळेच पशुंसवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची भूमिका पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

**पशुधनाची आकडेवारी**

महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ९० लाख जनावरे असून त्यातील ८० टक्के ग्रामीण भागात आहेत. राज्याचे वार्षिक दुग्ध उत्पादन १ कोटी टनांहून अधिक असून त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. पशुपालनातून सध्या २ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पद्धतीने रोजगारात गुंतलेली आहे.

**पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यास होणारे फायदे :**

कृषी समकक्ष दर्जा : पशुपालन व्यवसाय आता कृषी क्षेत्राशी समकक्ष मानला जाईल.

**वीज दरात सवलत :** या निर्णयांमध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५ हजार क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायासाठी, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी किंवा शेळीपालन आणि २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.

**सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदान :** कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**कर्जावरील व्याज दरात सवलत :** कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

**ग्रामपंचायत करात एकसमानता :** पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी, कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

**अंमलबजावणीसाठी निधी :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार.

या निर्णयामुळे पशुपालक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ होईलच, पण औषध उत्पादक कंपन्या, खाद्य उत्पादक कंपन्या, दूध संकलक आणि प्रक्रिया उद्योग, विक्रेते, वाहतूकदार यांसारख्या अप्रत्यक्षपणे संबंधित व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. तसेच यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरीबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीही आवश्यक ठरणार आहे.

शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे.

हा दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी पशुपालकांना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि त्यातून महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादन, रोजगार निर्मिती, आणि ग्रामीण विकासाला नवे बळ मिळेल, यात शंका नाही.

''पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा देणं हा ऐतिहासिक निर्णय असून यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होईल, शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंबे पशुपालन व्यवसायात असून त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यात पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती होईल.''

**– पंकजा मुंडे,** मंत्री, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**नंदकुमार बलभीम वाघमारे**
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

# केस गळती थांबवण्यासाठी याबियांचे सेवन करा

मुंबई : आजकाल बदलती जीवनशैली आणि चुकीच्या आहारामुळे केस गळण्याची समस्या खूप वाढली आहे. अशा परिस्थितीत, केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी योग्य आहार घेणे महत्त्वाचे आहे. विविध पोषक तत्वांनी परिपूर्ण अशा काही बिया (डशशवी) आहेत, ज्यांचे सेवन केल्याने केस गळती थांबून त्यांची वाढ होण्यास मदत होते.

१. अळशीच्या बिया (त्रश्चरु डशशवी):
अळशीच्या बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी सिडस् आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. हे घटक केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. ओमेगा-३ फॅटी सिडस् केसांना आतून पो-षण देतात, ज्यामुळे केस मजबूत आणि चमकदार होतात.

२. चिया सीड्स (उहळर डशशवी):
चिया सीड्समध्ये प्रोटीन, फायबर आणि ओमेगा-३ फॅटी सिडस् मोठ्या प्रमाणात आढळतात. प्रोटीन हे केसांच्या संरचनेचा मुख्य भाग असल्याने, त्याचे पुरेसे प्रमाण केसांना मजबूत बनवते आणि गळती कमी करण्यास मदत करते.

३. भोपळ्याच्या बिया (झीोंझ्ञिळप डशशवी):
भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक आणि मॅग्नेशियमसारखे महत्त्वाचे मिनरल्स असतात. झिंक केसांच्या कूपांना (हरळी षेश्रश्रळलश्रशी) मजबूत बनवते आणि त्यांची वाढ होण्यास मदत करते.

४. सूर्यफुलाच्या बिया (डींपषश्रेुशी डशशवी):
सूर्यफुलाच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई आणि सेलेनियमचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन ई हे एक प्रभावी अँटी-ऑक्सिडेंट आहे, जे केसांच्या कूपांना फ्री रॅडिकल्सच्या नुकसानीपासून वाचवते. यामुळे केसांची नैसर्गिक वाढ होते.

५. तीळ (डशीराश डशशवी):
तिळामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि प्रोटीन भरपूर असतात. विशेषतः काळ्या तिळामध्ये केस वाढवणारे पोषक घटक जास्त प्रमाणात आढळतात. तिळाचे सेवन केल्याने केस मजबूत होतात आणि त्यांचे गळणे थांबते.

सेवन कसे करावे? या बिया तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे तुमच्या आह-ारात समाविष्ट करू शकता.
त्यांना भाजून सॅलडमध्ये किंवा दह्यासोबत खाऊ शकता.
स्मूदी किंवा ओटमीलमध्ये मिसळून सेवन करू शकता.
बियांना रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी रिकाम्या पोटी खाणे अधिक फायदेशीर ठरते.
योग्य आहारासोबतच केसांना नियमित तेल लावणे, ताण-तणावापासून दूर राहणे आणि पुरे-शी झोप घेणे हे देखील केसांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.



# हिमालयाचे इशारे



**उत्तराखंडमधील उत्तरकाशमधील धराली, हिमाचल प्रदेशामधील मंडी जिल्हा आणि जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड तसेच कथुआ आदी भागांमध्ये ढगफुटीमुळे झालेली दुर्घटना ही निसर्गाशी खेळण्याचा परिणाम आहे. या आपत्तींबद्दल अनेक प्रकारचे दावे-प्रतिदावे ऐकायला मिळत आहेत. मात्र या आपत्तींनी पुन्हा एकदा पर्यावरण आणि विकास यांच्यात संतुलन राखण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले.**

**गेल्या दोन महिन्यांमध्ये उत्तराखंड, काश्मीर आणि हिमाचल प्रदेशामध्ये घडलेल्या घटना लक्षात घेतल्या आणि त्याची दखल घेऊन निसर्गाची होत असलेली हेळसांड थांबवली नाही, तर भविष्यात गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते. पूर आणि भूस्खलन हे निसर्गाशी असंतुलन असल्याचे पुरावे आहेत.**

**गेल्या महिन्यात वारंवार घडलेल्या भूस्खलन, ढगफुटी, पूर या घटनांनी सध्याच्या विकासाच्या धोरणांवर आणि पद्धतींवर पुन्हा एकदा चर्चा जोर धरू लागली आहे. आपण कथित विकासाच्या मार्गावर ज्या वेगाने पुढे जात आहोत, ते पाहता पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे, यात शंका नाही; पण निसर्ग वारंवार तडाखे देत असूनही आजही ते गांभीर्याने घेतले जात नाही.**

एकीकडे, उद्योगांचे स्वार्थ पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा बेफाट वापर केला जात आहे, तर दुसरीकडे अशास्त्रीय पद्धतीचे बांधकाम आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होत आहे. जीवन आणि मालमत्तेचे नुकसान होण्याबरोबरच या आपत्तींचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम होतो. आपत्ती येताना पूर्वसूचना देत नाही. ती अचानक येते आणि जीवित आणि मालमत्तेचे नुकसान करते. या आपत्तींमुळे मानवी, आर्थिक आणि पर्यावरणीय नुकसान होते. यातून सावरणे सोपे नसते.

हे खरे आहे, की कोणतीही आपत्ती रोखणे सोपे नाही; परंतु तिचे व्यवस्थापन करणे शक्य आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, नैसर्गिक अपघातांमुळे भारताला दर वर्षी सुमारे ९.८ अब्ज डॉलर्सचे नुकसान सहन करावे लागत आहे. गेल्या दोन दशकांमध्ये हवामान चक्रात वेगाने बदल दिसून येत आ-हेत. यामुळे हिमनद्या वितळू लागल्या असून त्या नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होत आहे. इतकेच नाही, तरपर्वतांचे नैसर्गिक सौंदर्य आपली ओळख गमावत आहे. बिघडत्या पर्यावरणामुळे पर्वतांमधील औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. पिके आणि फळांच्या उत्पादनावरही त्याचा परिणाम होऊ लागला आहे. विकासाच्या शर्यतीमध्ये कशीही बांधकामे केली जात आहेत. जंगले सतत नष्ट होत आहेत. पॅरिस हवामान करारात मान्य केलेल्या गोष्टी लागू करण्यापासून जग अजूनही खूप दूर आहे. यासाठी लहान देशांवर दबाव वाढत आहे आणि अनेक विकसनशील देशदेखील या दिशेनेकृती धोरण घेऊन पुढे येत आहेत; परंतु मोठे आणि विकसित देश त्याबद्दल गंभीर नाहीत. भारताने या दिशेने किती काम केले, हा प्रश्नदेखील महत्त्वाचा आहे.

नैसर्गिक संसाधनांचे अविचारी शोषण करण्याऐवजी, आपण अशा पर्यायांचादेखील विचार केला पाहिजे, जे संपूर्ण मानवजातीला लोभ, स्वार्थ आणि मोठे असल्याचा अभिमान यापासून दूर नेऊन आनंदी जीवनाची खात्री देतील. पावसाळा येताच नद्यांना पूर येणे ही भारतात एक सामान्य बाब आहे. यासोबतच भूकंप, अतिवृष्टी, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, भूस्खलन, हिम प्रपात, वीज आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्येही वाढ होत आहे. यामुळे दर वर्षी मोठ्या प्रमाणात विनाश होतो. मोठ्या प्रमाणात माणसे मृत्युमुखी पडतात. या आपत्तींचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. म्हणूनच पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने प्रत्यक्षात काम करणे महत्त्वाचे आहे.

नैसर्गिक आपत्तींच्या संख्येत अमेरिका आणि चीननंतर भारत जगात तिसर्या क्रमांकावर आहे. २०१३ मध्ये केदारनाथमध्ये झालेल्या मोठ्या विनाशानंतर राज्यात अशा लहान-मोठ्या घटना सतत घडत आहेत. याशिवाय २००४ मध्ये हिंदी महासा-गरात आलेली त्सुनामी, २००१ मध्ये गुजरातमधील कच्छमध्ये झालेला भूकंप आणि २०१४ मध्ये काश्मीरमधील पूर यासारख्या आपत्तींमध्ये मोठ्या संख्येन नागरिकु मृत्युमुखी पडले. आतापर्यंत ही ठिकाणे त्यांच्या पूर्व-आपत्ती स्वरूपात पुन्हा उभारली गेली ी नाहीत. आपण या सर्व आपत्तींपासून कोणताही धडा घेतलेला नाही, असे दिसते.

आपण निसर्गाचा प्रकोप थांबवू शकलो नाही, तरी जीवित आणि मालमत्तेचे नुकसान कमी करणे अशक्य आहे. जग वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. शहरांच्या विकासाबरोबरच, हिरवळीचे क्षेत्र कमी होत असून कॉंक्रीटची जंगले वाढत आहेत. त्यामुळे पर्यावरण बिघडत आहे. हवामान असंतुलन आणि हवामानचक्रातील बदलांमुळे छोट्या,मोठ्या वनस्पतींच्या व प्राण्यांच्या अनेक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पर्यावरणाचा संबंध मानवी जीवनात महत्त्वाचा आहे. दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. आपण विकासासमोर पर्यावरणाला बाजूला ढकलले आहे. सध्याच्या युगात, मानवी विच-ारसरणी इतकी बदलली आहे की भविष्याची चिंता केवळ कागदपत्रे आणि विधानांपुरती मर्यादित आहे. आपल्या कृतींमुळे आज माणूस निसर्गाचा नाश करत आहे. आपण अजूनही काळजी घेतली नाही आणि निसर्गाशी खेळणे थांबवले नाही, तर त्याचे धोकादायक परिणाम भोगण्यास तयार रहावे लागेल. पर्यावरणीय असंतुलनाचे वाढते धोके लक्षात घेता निसर्ग संवर्धनासाठी आपण आपल्या पातळीवर काय योगदान देऊ शकतो याचा विचार करावा लागेल. सरकारनेही नियम आणि कायदे काटेकोरपणे अंमलात आणले पाहिजेत आणि पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती केली पाहिजे.

गेल्या काही वर्षांमध्ये डोंगराळ राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटना वाढत आहेत. चालू वर्षी आतापर्यंत हिमाचल प्रदेशामध्ये ढगफुटीच्या ३५ घटना घडल्या आहेत. त्या गेल्या वर्षीपेक्षा जास्त आहेत. २०२४ मध्ये ढगफुटीच्या सुमारे २७ घटना घडल्या होत्या; परंतु या वेळी दीड महिन्यात गेल्या वर्षीचा आकडा मागे पडला आहे. हा आकडा आणखी वाढू शकतो, कारण या वेळी पावसाळा जास्त काळ टिकण्याची अपेक्षा आहे. हिमाचल प्रदेशमधील कुलु जिल्ह्यातील गणवी येथे नुकतेच ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान झाले. ढगफुटीच्या ३५ घटनांपैकी १९ घटना एकट्या मंडी जिल्ह्यात घडल्या.


हवामानतज्ज्ञांच्या मते ढगफुटीची घटना शोधण्यासाठी कोणताही ठराविक मापदंड नाही. जेव्हा शंभर मिलीमीटर प्रति तास पाऊस पडतो, तेव्हा ती ढगफुटीची घटना मानली जाते. याशिवाय मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीला ढगफुटी असेही म्हण-तात. शिमला जिल्ह्यातील रामपूरमध्ये ढगफुटीमुळे मोठे नुकसान झाले. पूर्वीही डोंगराळ राज्यांमध्ये पाऊस पडत असे; पण अशा प्रकारचा विनाश होत नव्हता. या विनाशाला हवामान बदल आणि अवैज्ञानिक बांधकाम कारणीभूत आहे. अवैज्ञानिक खाणकाम आणि बांधकामामुळे या आपत्ती येत आ-हेत. डोंगराळ राज्यांमध्ये ढगफुटीच्या वाढत्या घटना आणि योजता येण्याजोगे प्रभावी उपाय तपासण्यासाठी केंद्रीय पथकाच्या अहवालाची प्रतीक्षा आहे. मंडी आणि सिमला येथील घटनांचा विविध तज्ज्ञांच्या पथकाने अभ्यास केला आहे. हे पथक सरकारला अहवाल सादर करेल. त्यानंतर पुढे काय उपाययोजना करायच्या, हे ठरणार आहे.

-मिलिंद बेंडाळे

## डॉक्टर टीप्स

### रात्री उशिरा झोपणार्या पुरुषांना नपुंसक होण्याचा धोका

मूळ कारण आहे. या व्यतिरिक्त अनेक कारणं देखील सामील आहेत ज्यात मनोवैज्ञानिक कारणं देखील आहेत. झोप न झाल्यामुळे पुरुषांना अधिक ताण जाणवतो ज्यामुळे त्यांच्या पौरुष क्षमतेवर वाईट परिणाम पडतो. म्हणून पुरुष असो वा महिला दोघांनी किमान ७ ते ८ तास झोप काढावी. या व्यतिरिक्त झोपेच्या वेळेत खूप बदल नसावा. झोपेची वेळ निश्चित असल्यास उत्तम. कारण चांगली आणि पूर्ण झोपेमुळे शुक्राणूंची गुणवत्ता वाढते आणि त्यामुळे प्रजनन क्षमतेत देखील सुधार होतो.



## विनोद




राहुल : 'तू लहानपणी रंगवलेलं एखादं स्वप्न खरं झालंय का रे?'
सचिन : 'एकच, लहानपणी माझी आई जेव्हा माझा भांग पाडायची तेव्हा मला नेहमी वाटायचं मला केसच नसते तर...'

## संदेश

Bank mein 1 bhi rupaya jama nahin kiya.
Phir bhi Income Tax Department se notice aaya,
Likha tha,"Kuchh to Kama Besharm"!


## सुविचार



एकमेकांनी एकमेकांना सुखाने जगू देणे हेच भगवंताचे भजन आहे, देवाचे पूजन आहे, तोच खरा धर्म आहे. धर्माचा उपयोग आत्मिक शांती आणि समाजाची दुःखे निवारण्यासाठी असतो. माणसाकरिता धर्म आहे, धर्माकरिता माणूस नाही.
**- संत तुकडोजी**

**संस्कृत सुभाषित**
कारे नाठविशी कृपाळू देवासी ।
पोशितो जगासी एकलाचि।।
**अर्थ :** संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे देत नाही. उदार मन आणि त्या दुसऱ्यासाठी काही करणे, झिजणे हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. दया
३. मांडी
५. अदबीने
१०. वस्तू, जिन्नस
११. काथ्यकूट, तीच-ती चर्चा
१२. तात्पर्य
१३. थापा मारणारा
१५. सुवर्ण
१७. दुधाचे पक्वान्न
१९. सूर्यमालेचा घटक
२०. एक ज्वालाग्राही पदार्थ
२१. भाताचा एक चवदार प्रकार
२२. पुरेसे, पुष्कळ
२४. सर्व
२६. कुटील बेत, कारस्थान
२७. भ्रम, जादू
२८. घर
२९. पश्चात्ताप
३२. परतंत्र
३३. आकर्षण, लोभ
३४. जमीन
३५. ढग
३७. विष
४०. आई
४१. सूर्य
४२. चांगले नशीब
४३. जाणुनबुजून, हेतूतः
४५. पवित्र
४७. देवदासची प्रेयसी
४८. अभिनेता
४९. भय
५१. नशीब
५२. पती
५४. अधीन
५५. सगळ्यात महाग रत्न
५६. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड
५७. सरबताचे आंबट फळ
५९. गाढव आणि ससा
६१. जास्त वजनाचे
६३. मोठ्या आकराचे
६५. जोखड
६६. मासा
६८. श्रीमंत
७०. उद्यान
७२. कावळा
७३. थोर
७५. वृक्ष
७६. पुष्कळ
७७. पोट
७८. अशक्य, टोकाचा
७९. राजाची आई
८१. केसांचा कृत्रिम रंग
८२. राजाची गाडी
८३. जंगल
८४. कसोटी

## उभे शब्द

१. गोंगट
२. धाक
३. स्वीकार
४. सोन्याचे शुद्धतेचे प्रमाण
५. अजून
६. पृथ्वी
७. पुराचा फटका बसलेले
८. गोष्ट
९. वेळ दाखवणारे यंत्र
१४. अंत, मर्यादा
१६. नवीन
१८. कुमक
२२. भिववणारे
२३. सेतू
२५. आर्जवे, अजीजी
२६. वस्त्र
२७. चोप
२८. निर्हेतुक, लीलया
३०. प्रखरता, तीष्णता
३१. चमत्कारिक
३२. पावलांचा आवाज
३६. मातीचे पात्र बनवणारा
३८. सहस्रावधी
३९. पुच्छ
४०. शेवटचा मणका
४४. सिंह
४५. शंकराचे प्रतीक
४६. एखाद्या भरवशावर राहणे
४७. बंध
५०. युद्धभूमी
५३. उसाचा काकवीपेक्षा दाट रस
५४. रंग
५५. डासामुळे होणारा आजार
५८. तळ, खालचा भाग
६०. काव्य
६२. बारा
६३. टोक
६४. बांधून ठेवणारी गोष्ट
६७. बकरा
६९. अवास्तव, खूप जास्त
७०. परका, बाहेरून आलेला
७१. ---- महावीर-जैनांचे तीर्थंकर
७२. कथेपेक्षा दीर्घ वाङ्मय प्रकार
७३. सहाय्य
७४. पराभव
७५. मनातील भावना, मनोव्यापार
७८. स्वाभाविक आवड, प्रवृत्ती
८०. किंचित

## आडवे उत्तरे

१.कणव ३.पट ५.आदरपूर्वक १०.माल ११.चर्वित-चर्वण १२.सार १३.थापाड्या १५.कनक १७.खीर १९.ग्रह २०.राळ २१.पुलाव २२.भरपूर २४.समस्त २६.कावा २७.माया २८.सदन २९.उपरती ३२.परवश ३३.मोह ३४.धरा ३५.जलद ३७.जहर ४०.माता ४१.रवी ४२.सौभाग्य ४३.जाणीवपूर्वक ४५.शिव ४७.पारो ४८.नट ४९.डर ५१.दैव ५२.नवरा ५४.वश ५५.हिरा ५६.सहाण ५७.लिंबू ५९.लंबकर्ण ६१.अवजड ६३.अगडबंब ६५.जू ६६.झक ६८.धनवान ७०.उपवन ७२.काक ७३.महान ७५.विटप ७६.उदंड ७७.उदर ७८.कमालीचा ७९.राजमाता ८१.कलप ८२.रथ ८३.रान ८४.परीक्षा

## उभे उत्तरे

१.कलकलाट २.वचक ३.पतकर ४.टच ५.आणखी ६.रसा ७.पूरग्रस्त ८.कथा ९.घड्याळ १४.पारावार १६.नव १८.रसद २२.भयावह २३.पूल २५.मनधरणी २६.कापड २७.मार २८.सहज ३०.तीव्रता ३१.अजब ३२.पदरव ३६.कुंभार ३८.हजारो ३९.शेपूट ४०.माकडहाड ४४.वनराज ४५.शिवलिंग ४६.अवलंबन ४७.पाश ५०.रण ५३.राब ५४.वर्ण ५५.हिवताप ५८.बूड ६०.कवन ६२.डझन ६३.अग्र ६४.बंधन ६७.बोकड ६९.वारेमाप ७०.उपरा ७१.वर्धमान ७२.कादंबरी ७३.मदत ७४.हार ७५.विचार ७८.कल ८०.जरा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत-पाकिस्तानचा पुन्हा महामुकाबला, टीम इंडियाच्या सुपर-४ च्या ३ सामन्यांच्या तारखा जाहीर!

दुबई -आशिया कपमध्ये पाकिस्तानने युएईचा पराभव करून सुपर-४ मध्ये प्रवेश केला आहे. ग्रुप ए मधून सुपर-४ मध्ये प्रवेश करणारी पाकिस्तान भारतानंतरची दुसरी टीम ठरली आहे. ग्रुप ए मधील सुपर-४ चे चित्र स्पष्ट झाल्यामुळे आता पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये सामना होणार आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातल्या या सामन्याची तारीखही समोर आली आहे. रविवार २१ सप्टेंबरला पुन्हा एकदा दुबईमध्येच दोन्ही टीमची मॅच होईल. एकीकडे ग्रुप एमधल्या सुपर-४ च्या दोन्ही टीम निश्चित झाल्या असल्या तरी ग्रुप बीच्या २ टीम मात्र गुरूवारी निश्चित होणार आहेत. गुरूवारी श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यात ग्रुप बी मधील लढत होणार आहे. या सामन्यात श्रीलंकेचा विजय झाला तर श्रीलंका आणि बांगलादेश या दोन टीम सुपर-४ मध्ये प्रवेश करतील. पण अफगाणिस्तानने विजय मिळवला तर श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या ज्या २ टीमचा नेट रनरेट चांगला असेल, त्या टीम सुपर-४ मध्ये जातील.

***

### युएई ने हातातली मॅच घालवली, पाकिस्तानला मिळाली सुपर ४ ची लाईफलाईन!

दुबई-आशिया कप २०२५ मध्ये पाकिस्तानने युएईचा ४१ रननी पराभव केला आहे. याचसोबत ग्रुप ए मधून भारतासह पाकिस्तान सुपर-४ मध्ये पोहोचली आहे. पाकिस्तानने दिलेल्या १४७ रनच्या आव्हानाचा पाठलाग करताना युएईचा १०५ रनवरच ऑलआऊट झाला. पाकिस्तानला २० ओव्हरमध्ये १४६९ वर रोखल्यानंतर युएईच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. तसेच त्यांची सुरूवातही चांगली झाली होती.पाकिस्तानच्या आव्हानाचा पाठलाग करताना युएईने १४ व्या ओव्हरमध्ये ८५ रनवर ३ विकेट गमावल्या होत्या, पण यानंतर युएईची बॅटिंग कोसळली आणि पुढच्या २० रनमध्येच त्यांनी ७ विकेट गमावल्या. पाकिस्तानकडून शाहिन आफ्रिदी, हारिस राऊफ, अबरार अहमद यांना प्रत्येकी २-२ विकेट मिळाल्या. तर सॅम अयुब आणि सलमान आघाने १-१ विकेट घेतली.

***

### सलग ३ डावात शून्यावर बाद झाला; पाकच्या फलंदाजाची नाचक्की!

मुंबई -आशिया चषक २०२५ च्या स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याची धमकी मागे घेतल्यानंतर पाकिस्तानने १७ सप्टेंबर रोजी अखेरच्या साखळी सामन्यात कडवी झुंज दिलेल्या यूएईचा ४१ धावांनी पराभव केला. याविजयासह पाकिस्तानने सुपर फोर फेरीत प्रवेश निश्चित केला. त्यामुळे २१ सप्टेंबर रोजी आता पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येणार आहेत. दरम्यान, सध्या पाकिस्तानचा सलामीवीर सईम अयुबची चर्चा रंगलीय.

पाकिस्तानचा सलामीवीर सईम अयुब आशिया चषकातील तीनही साखळी सामन्यात अपयशी ठरला. पाकिस्तान क्रिकेट संघाच्या माजी खेळाडूंनी आशिया चषक सुरु होण्याआधी सईम अयुबचं तोंडभरुन कौतुक केलं होतं. तसेच भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला षटकार मारण्याची स्वप्न पाहणारा सईम अयुब सलग तीन सामन्यात शून्यावर बाद झाल्याने त्याची नाचक्की झाली आहे. सलग तीन सामन्यात खातंही उघडता न आल्याने सईम अयुबला सोशल मीडियावर ट्रोल करण्यात येत आहे.

***

### पहिले बहिष्कार घालण्याचा निर्णय, मग १ तासाने मैदानात दाखल

दुबई-आशिया कपमध्ये दुबईमध्ये पाकिस्तान आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) यांच्यात खेळला गेलेला सामना चर्चेत राहिला. पाकिस्तानने हा सामना ४१ धावांनी जिंकला आणि सुपर फोरमध्ये स्थान मिळवले. पण, हा सामना नाट्यमय ठरला. हा सामना आधीच तासभर उशिरा सुरू झाला होता, कारण हस्तांदोलनाच्या वादावरून पीसीबी मॅच रेफरीवर संतापली होती आणि बॉयकॉट करण्याचा विचार करत होती. सामन्यादरम्यान, एक अशी घटना घडली ज्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. एका पाकिस्तानी खेळाडूच्या चुकीमुळे पंच जखमी झाला. पण, माजी पाकिस्तानी खेळाडू वसीम अक्रमच्या टिप्पणीमुळे वाद पेटला.पाकिस्तान आणि यूएई सामन्यात नेमकं काय घडलं?ही घटना यूएईच्या डावात पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात घडली. पाकिस्तानचा विकेटकीपर हारिसने फेकलेला चेंडू थेट अंपायरच्या डोक्याच्या मागे लागला. चेंडू बसताच अंपायर खाली बसला. आणि लगेच पाकिस्तानी खेळाडू त्यांच्या जवळ धावून गेले आणि मेडिकल टीमला बोलावण्याचा इशारा केला. पाकिस्तानचा फिजिओ आला, त्याने कन्सशन टेस्ट केली. पण त्यानंतर अंपायर रुचिरा पल्लियागुरुगे यांना सामना सोडून मैदानाबाहेर जावे लागले.

## आशिया चषक मध्ये श्रीलंकेचा अफगाणिस्तानवर दणदणीत विजय!



**नवी दिल्ली:** आशिया चषक २०२५ स्पर्धेत सुपर ४ मध्ये प्रवेश करणारे ४ संघ ठरले आहेत. कोणते आहेत ते संघ? आशिया चषक २०२५ स्पर्धेतील ११ वा सामना श्रीलंका आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना सुपर ४ मध्ये प्रवेश करण्याच्या दृष्टीने ३ संघांसाठी अतिशय महत्वाचा होता. अफगाणिस्तानला सुपर ४ मध्ये प्रवेश करण्यासाठी हा सामना जिंकायचा होता. तर श्रीलंकेला धावांचा पाठलाग करताना १०१ धावांचा पल्ला गाठायचा होता. तर अफगाणिस्तानचा पराभव होताच बांगलादेशचा संघ सुपर ४ मध्ये प्रवेश करणार होता. अफगाणिस्तानने हा सामना जिंकण्यासाठी श्रीलंकेसमोर १७० धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने ६ गडी राखून विजय मिळवला. यासह श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे.

श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी २० षटकात १७० धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाला हवी तशी सुरूवात करून देता आली नाही. तो अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. मात्र सलामीला आलेला कुसल मेंडिस शेवटपर्यंत उभा राहिला आणि श्रीलंकेला विजय मिळवून दिला. त्याने नाबाद ७४ धावांची खेळी. तर कुसल परेराने २८ धावा केल्या. कर्णधार चरिथ असलंकाने १७ धावा केल्या. या विजयासह श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे. तर अफगाणिस्तानचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला असून बांगलादेशचा संघ ब गटातून सुपर ४ फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे. तर बांगलादेशचा संघ दुसरा संघ ठरला आहे.

दुबई नाही 'या' मैदानावर भिडणार भारत-ओमानचे संघ, सामना लाईव्ह कुठे पाहता येणार? जाणून घ्या

या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांअखेर ८ गडी बाद १६९ धावा केल्या. या सामन्यात अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबीने सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. सलामीला फलंदाजी करताना रहमानुल्लाह गुरबाजने १४ धावा केल्या. तर सेदीकुल्लाह अटलने १८ धावा केल्या. इब्राहिम जदरानने २४ धावा केल्या.

मोहम्मद नबी सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने ३ चौकार आणि ६ षटकारांच्या साहाय्याने ६० धावांची खेळी केली. राशिद खानने २४ धावा केल्या. २० षटकांअखेर अफगाणिस्तानने ८ गडी बाद १६९ धावा केल्या.

सुपर ४ मध्ये जाणारे ४ संघ ठरले

या स्पर्धेतील अ गटातून भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी सुपर ४ मध्ये आधीच प्रवेश केला होता. तर ग्रुप बी मध्ये श्रीलंका, अफगाणिस्तान आणि बांगलादेश या तिन्ही संघांमध्ये जोरदार लढत पाहायला मिळाली. अफगाणिस्तानला सुपर ४ मध्ये प्रवेश करण्यासाठी केवळ हा सामना जिंकायचा होता. पण ते असं करू शकलेले नाहीत. त्यामुळे बांगलादेशचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला आहे.

तर धावांचा पाठलाग करत असताना १०१ धावा करताच श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला. त्यामुळे श्रीलंकेने हा सामना गमावला असता तरीदेखील श्रीलंकेचा संघ सुपर ४ साठी पात्र ठरला असता. अशा स्थितीत, बांगलादेशचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला असता. येत्या शनिवारपासून सुपर ४ फेरीतील सामन्यांना सुरूवात होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणारा सामना २१ सप्टेंबरला होणार आहे.

## श्रीलंकेविरुद्ध अफगाणच्या या क्रिकेटरने केली कमाल



अबू धाबी: आशिया कप २०२५ मध्ये श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील 'करो वा मरो' सामन्यात अफगाणिस्तानचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबीने ऐतिहासिक खेळी केली. श्रीलंकेच्या डावातील शेवटच्या षटकात त्याने केलेल्या तुफानी फलंदाजीने सर्वांनाच थक्क केले. त्याने श्रीलंकेचा युवा फिरकी गोलंदाज दुनिथ वेल्लालागेच्या एकाच षटकात तब्बल ५ षटकार ठोकले आणि एकूण ३२ धावा चोपून काढल्या. सामन्याच्या १९व्या षटकापर्यंत अफगाणिस्तानचा संघ ७ बाद १३७ अशा अडचणीच्या स्थितीत होता. अशा वेळी, श्रीलंकेच्या कर्णधाराने शेवटचे षटक टाकण्यासाठी वेल्लालागेला गोलंदाजी दिली. हा निर्णय श्रीलंकेसाठी खूपच महागात पडला. नबीने वेल्लालागेच्या पहिल्या तीन चेंडूवर सलग तीन उत्तुंग षटकार ठोकले. चौथा चेंडू नो-बॉल होता आणि त्यावरही त्याने षटकार मारला. त्यानंतर पाचव्या चेंडूवरही नबीने षटकार खेचत श्रीलंकेच्या गोलंदाजीला अक्षरशः नेस्तनाबूत केले. या षटकात एकूण ३२ धावा निघाल्या, ज्यात एका नो-बॉलचा समावेश होता.

या धमाकेदार खेळीमुळे अफगाणिस्तानने २० षटकांत १६९ धावांपर्यंत मजल मारली. नबीने अवघ्या २२ चेंडूत ६० धावांची शानदार खेळी केली. या खेळीमुळे त्याने अफगाणिस्तानकडून टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वात वेगवान अर्धशतक (२० चेंडूत) झळकावण्याचा विक्रमही केला. त्याची ही कामगिरी केवळ संघाला चांगल्या स्थितीत आणणारीच नव्हती, तर प्रतिस्पर्धकांवर मानसिक दबाव आणणारीही ठरली.

या सामन्यात श्रीलंकेला हरवून सुपर फोरमध्ये आपले स्थान पक्के करण्यासाठी अफगाणिस्तानसाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा आहे. नबीच्या या विस्फोटक खेळीमुळे आता अफगाणिस्तानने विजयाकडे एक मोठे पाऊल टाकले आहे.

## बिसीसीआय चा नवा अध्यक्ष कोण, अमित शाहांच्या नेतृत्त्वातील बैठकीत शिक्कामोर्तब होणार?

मुंबई-भारतीय क्रिकेटसाठी २८ सप्टेंबरचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असणार आहे. या दिवशी बीसीसीआयच्या सर्वोच्च पदाधिकाऱ्यांची निवड होणार आहे. सर्वात मोठा प्रश्न अध्यक्षपदाचा आहे, कारण माजी क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांचा कार्यकाळ संपला आहे. सध्या उपाध्यक्ष राजीव शुक्ला हे बीसीसीआयचे अंतरिम अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. दरम्यान, यासंदर्भात दिल्लीमध्ये एक महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती मिळत आहे, ज्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बीसीसीआय अधिकाऱ्यांची चर्चा होणार आहे.

क्रिकबझच्या अहवालानुसार, २० सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये सत्ताधारी पक्षाच्या काही सदस्यांसह बीसीसीआय पदाधिकाऱ्यांची बैठक होईल. त्याच दिवशी पुढील अध्यक्ष कोण होणार याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. मात्र, अधिकृत घोषणा २८ सप्टेंबरला अपेक्षित आहे. ही अनौपचारिक बैठक अमित शाह यांच्या निवासस्थानी होणार असून, बीसीसीआयच्या पुढील नेतृत्वाचा अंतिम आराखडा तेथे निश्चित केला जाईल.

सौरव गांगुली अन् हरभजन सिंग यांचे नाव चर्चेत

२०२२ मध्येही अशाच एका बैठकीत माजी अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांनी तत्कालीन बीसीसीआय प्रमुख सौरव गांगुली यांच्या तीन वर्षांच्या कामगिरीवर कठोर टीका केली होती. त्यावेळी गांगुली पुन्हा अध्यक्षपदावर कायम राहू शकले असते, परंतु शेवटी रॉजर बिन्नी यांची निवड झाली. या वेळी गांगुली यांना पुन्हा बोलावले जाईल की नाही, याबाबत अनिश्चितता आहे. मात्र, त्यांचे नाव तसेच त्यांचे माजी सहकारी हरभजन सिंग यांचे नाव चर्चेत आहे.

याशिवाय कर्नाटकमधील माजी कसोटीपटू रघुराम भट्ट आणि माजी भारतीय यष्टीरक्षक किरण मोरे हेदेखील संभाव्य उमेदवार मानले जात आहेत. किरण मोरे हे एजीएममधील प्रतिनिधी नसले तरी, अशा परिस्थितीसाठी बीसीसीआयच्या नियमांत तरतूद आहे.

## कर्णधार श्रेयस अय्यर नापास! पण, ध्रुव जुरेल ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना अक्षरश: धू धू धुतल

दिल्ली-भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यातील पहिला कसोटी सामना १६ सप्टेंबरपासून लखनौ येथे खेळला जात आहे. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारली. सॅम कॉन्स्टास आणि जोश फिलिप यांनी ऑस्ट्रेलियाकडून शानदार शतके झळकावून भारतीय गोलंदाजांना त्रास दिला. ऑस्ट्रेलिया अ संघाच्या पहिल्या डावातील ५३२ धावांच्या प्रत्युत्तरात, भारत अ संघाच्या फलंदाजांनी त्यांच्या पहिल्या डावात जोरदार कामगिरी केली. यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने ११४ चेंडूत नऊ चौकार आणि तीन षटकारांसह हा टप्पा गाठत शानदार शतक झळकावले. ध्रुव जुरेलने देवदत्त पडिक्कलसह पाचव्या विकेटसाठी आधीच शतकी भागीदारी केली आहे.

जुरेलचं प्रथम श्रेणी कारकिर्दीतील दुसरे शतक

ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध शानदार शतक झळकावणारा भारत अ संघाचा यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने त्याच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील दुसरे शतक झळकावले. त्याने देवदत्त पडिक्कलसोबत पाचव्या विकेटसाठी मजबूत भागीदारी केली, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया अ संघाच्या पहिल्या डावातील ५३२ धावांच्या प्रत्युत्तरात भारत अ संघाला जोरदार पुनरागमन करण्यास मदत झाली. पडिक्कलनेही शानदार अर्धशतक झळकावले. लखनौमधील पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, भारतीय फलंदाजांनी शानदार फलंदाजी केली आणि ऑस्ट्रेलिया अ संघाच्या गोलंदाजांना पूर्णपणे धुव्वा उडवला.



वेस्ट इंडिज मालिकेत मिळणार संधी?

भारत अ संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर नापास

टीम इंडियामध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न करणारा श्रेयस अय्यर गेल्या काही काळापासून त्याच्या बॅटने संघर्ष करत आहे. भारत अ संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने पुन्हा एकदा संघाला निराश केले. त्याचा डाव फक्त १३ चेंडूत संपला. ऑस्ट्रेलियन फिरकी गोलंदाज कोरी रोचिओलीने त्याला पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले. दुसऱ्या डावात जरा तरी खेळेल अशी चाहत्यांची अपेक्षा होती, पण अय्यरने पुन्हा एकदा निराशा केली आणि फक्त १२ धावा करून परतला.

चार फलंदाजांची धमाकेदार खेळी

ऑस्ट्रेलिया-एविरुद्ध नारायण जगदीशनने ११३ चेंडूत ७ चौकार, १ षटकार ठोकत ६४ धावांची दमदार खेळी केली. सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन ४४ धावा करून बाद झाला, पण टीमला भन्नाट सुरुवात देऊन गेला. साई सुदर्शनने १२४ चेंडूत १० चौकारांसह ७३ धावा ठोकल्या. त्याशिवाय बातमी लिहीपर्यंत भारताचा स्कोअर ४ बाद ४०३ इतका झालेला होता. देवदत्त पडिक्कल तर शतकाच्या उंबरठ्यावर उभा आहे.

ऑस्ट्रेलिया-ए च्या फलंदाजांनी इंडिया-एच्या गोलंदाजांची केली धुलाई

त्याआधी ऑस्ट्रेलिया-एच्या फलंदाजांनी इंडिया-एच्या गोलंदाजांची अक्षरश: धुलाई केली. त्यांनी पहिल्या डावात ६ बाद ५३२ वर डाव घोषित केला. त्यात दोन फलंदाजांनी शतकं ठोकून भारतीय गोलंदाजीचा समाचार घेतला.

## पाकला अडचण सूर्यकुमार यादवची; म्हणे, मुख्य आक्षेप त्याच्या विधानावर

मुंबई -आशिया चषकातील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यानंतर मोठा वाद पेटला आहे. भारताच्या खेळाडूंनी सामन्यानंतर पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही आणि यावरून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आणि संघाने मोठा वाद घातला. आयसीसीकडून मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना आशिया चषकातून काढण्याची मागणी केली होती. पीसीबीचा आरोप होता की पायक्रॉफ्टने सलमान आघाला नाणेफेकीदरम्यान सूर्यकुमारशी हस्तांदोलन करण्यास मनाई केली होती. या प्रकरणानंतर युएईविरूद्ध सामन्याआधी मोठी चर्चा झाली आणि मग संघ सामन्यासाठी मैदानावर उतरला.

पाकिस्तानच्या उच्च क्रिकेट अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी पत्रकार परिषद घेतली आणि सांगितलं की स्पर्धेतून माघार घेण्याच्या निर्णयाचा देखील विचार करण्यात आला होता. पीसीबी प्रमुख मोहसिन नक्वी, त्यानंतर माजी पीसीबी प्रमुख नजम सेठी आणि रमीझ राजा यांनी पत्रकार परिषदेत सहभाग घेतला. जिथे अँडी पायक्रॉफ्ट यांना भारताचे आवडते सामनाधिकारी म्हणून वर्णन केले गेले.

तर सामना संपल्यानंतरच्या सादरीकरण समारंभात सूर्यकुमार यादवने दिलेल्या विधानावर आक्षेप घेण्यात आला, ज्यामध्ये त्याने पाकिस्तानविरुद्धचा विजय पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना आणि भारतीय सैन्याला समर्पित केला.

पीसीबी प्रमुख मोहसीन नक्वी म्हणाले, मफ्रजसे तुम्हा सर्वांना ठाऊक आहे, १४ सप्टेंबरपासून हा वाद सुरू आहे.

सामन्यातील रेफरी (अँडी पायकॉफ्ट) यांच्या भूमिकेबाबत आम्हाला आक्षेप होता. थोड्यावेळापूर्वी रेफरीने संघाचे प्रशिक्षक, कर्णधार आणि व्यवस्थापक यांच्याशी चर्चा केली. त्यांनी स्पष्ट सांगितलं की अशी घटना (हस्तांदोलन न होणे) घडायला नको होती. याआधीदेखील आम्ही आयसीसीकडे सामन्यादरम्यान झालेल्या आचारसंहितेच्या उल्लंघनाची



चौकशी करण्याची मागणी केली होती.फ्रm मफ्राजकारण आणि खेळ हे वेगळेच राहायला हवेत, असे आमचे ठाम मत आहे. हा खेळ आहे, तो तसाच राहू द्या. क्रिकेटला या सगळ्यापासून दूर ठेवायला हवे. मी नजम सेठी आणि रमीज राजा यांनी विनंती केली होती. बहिष्कार घालणे हा अतिशय मोठा निर्णय होता. त्यामध्ये पंतप्रधान, सरकारी अधिकारी आणि इतर अनेक लोक सहभागी होते आणि त्यांचे आम्हाला पूर्ण समर्थन मिळाले. आम्ही या संपूर्ण प्रकरणावर लक्ष ठेवून होतो.फ्फ मफ्फीसीबीचे उद्दिष्ट नेहमी एकच राहिले आहे, खेळात राजकारण येऊ नये. मी स्वत: अध्यक्ष होतो तेव्हाही हेच उद्दिष्ट होते आणि आजही तेच आहे. त्यांनी राजकारण केले, आम्ही नाही. आम्ही माफीची मागणी केली होती आणि ती माफी मिळाली आहे. विजेता ठरलेय क्रिकेटच. जग आमच्या भूमिकेला पाठिंबा देतेय आणि भारताच्या भूमिकेवर जगाची प्रतिक्रिया तुम्ही सगळे पाहत आहात.फ्फ, असे नजम सेठी यांनी सांगितले.

सूर्यकुमार यादवच्या वक्तव्यावर सर्वात मोठा आक्षेप – रमीझ राजा

मफ्गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती, जिथे भावना महत्त्वाच्या होत्या. पण मला आनंद आहे की आपण भावनेच्या भरात असा काही निर्णय घेतला नाही ज्यामुळे क्रिकेटला धक्का बसला असता, जे खूप महत्त्वाचे आहे. आता या क्रिकेट संघाने बोलणं कमी करून खेळातूनच उत्तर द्यावे आणि कहाणी पुढे न्यायची आहे. ज्या भावना तुम्ही अनुभवल्या, त्या मैदानावर दाखवा आणि जगाला दाखवा आपण किती मोठे क्रिकेट राष्ट्र आहोत. माझ्यासाठी सर्वात मोठी आक्षेपार्ह गोष्ट म्हणजे सामना संपल्यानंतरच्या सादरीकरणात (भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव याने) केलेले वक्तव्य. तोच खरा तर निर्णायक मुद्दा होता.

अँडी पायक्रॉफ्ट भारताचे आवडते मॅच रेफरी – रमीझ राजा

मफ्जर मॅच रिफरीने माफी मागितली असेल तर ते चांगले आहे. कारण क्रिकेट म्हणजे क्रिकेटच असलं पाहिजे, नाहीतर याला काही अर्थ नाही. मोहसीन नक्वी यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी होणार आहे, जेणेकरून अशा गोष्टी पुन्हा घडू नयेत. पण एक गंमतीशीर मुद्दा म्हणजे अँडी पायक्रॉफ्ट हा भारताचा आवडता मॅच रिफरी आहे. मी जेव्हा कधी कमेंट्रीसाठी किंवा नाणेफेकीला जातो, तेव्हा मला वाटते की पायक्रॉफ्ट भारताच्या सामन्यांचा कायम स्वरूपी भाग आहे. कारण तो भारताच्या सामन्यांत तब्बल ९० वेळा मॅच रेफरी राहिला आह, हे खूप एकतर्फी वाटते, असे होऊ नये. हे एक तटस्थ व्यासपीठ आहे. आता तरी शहाणपणाने निर्णय होतील अशी मला आशा आहे.

# लातूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची शासनाकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून, यामुळे लातूर जिल्ह्यात ओल्या दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाकडे ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे.

मागील १५-२० दिवसांपासून लातूर जिल्हा, मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, बुधवार, १७ सप्टेंबर रोजी खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज देशमुख यांच्यासह लातूर जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली.



शासनाकडे भरीव मदतीची मागणी:

लातूर येथील काँग्रेस भवनमध्ये झालेल्या या बैठकीत आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी ठीक ठिकाणी जाऊन घेतलेल्या नुकसानीच्या माहितीचा विस्तृत आढावा घेतला. आढावा बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत आमदार अमित देशमुख यांनी शासनाने लातूर जिल्ह्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा, तसेच शेतकरी, शेतमजूर आणि आपत्तीग्रस्तांना भरीव मदत देऊन त्यांना धीर द्यावा अशी मागणी केली. या संदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सविस्तर निवेदन देणार असलयाचे सांगीतले.

लातूर जिल्हयातील गंभीर परिस्थितीचा विचार करून, संपूर्ण लातूर जिल्ह्याला ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट मदतीच्या उपाययोजना त्वरित राबवाव्यात, वीज पडून किंवा पुरात वाहून मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत द्यावी, वाहून गेलेल्या प्रत्येक पशुधनासाठी १ लाख रुपयांची मदत द्यावी, नदीकाठच्या वाहून गेलेल्या जमिनी शासनाच्या खर्चाने पूर्ववत करून द्याव्यात, नदीकाठी वाहून गेलेल्या पिकांच्या नुकसानीसाठी प्रति एकर २ लाख रुपयांची मदत द्यावी, फळबागांच्या नुकसानीसाठी प्रति एकर २ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, बागायती जमिनीसाठी प्रति एकर १ लाख रुपये तर कोरडवाहू जमिनीसाठी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, वाहून गेलेल्या विद्युत मोटारी, ट्रॅक्टर आणि शेती अवजारांचे पंचनामे करून त्यांची भरपाई द्यावी, उदगीर तालुक्यातील बोरगाव या आपत्तीग्रस्त गावाचे तात्काळ पुनर्वसन करावे, या परिस्थितीत तातडीने लक्ष घालून लातूर जिल्ह्याला संकटातून बाहेर काढावे आदी मागण्या आपण शासनाकडे करणार आहोत असे सांगीतले. शासनाकडून अपेक्षित मदत मिळेपर्यंत विधिमंडळ आणि संसदेत पाठपुरावा केला जाईल, प्रसंगी यासाठी आंदोलन करावे लागले तरी ते केले जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, ॲड. समद पटेल, माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, सौ. विदया पाटील, सौ.शिला पाटील, अमर खानापूरे, ॲड.कल्याण पाटील, डॉ. दिनेश नवगिरे, व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, प्रवीण पाटील, सर्जेराव मोरे, सुभाष घोडके, विजय देशमुख, एन.आर. पाटील, दगडूआप्पा मिटकरी, प्रविण सुर्यवंशी, लक्ष्मण कांबळे, विजयकुमार पाटील, नारायण लोखंडे, गणपतराव बाजुळगे, इम्रान सय्यद, रमाकांत गडदे, फारुख शेख, प्रवीण कांबळे, मारुती पांडे, सुरेश चव्हाण, अजित माने, सहदेव मस्के, राम स्वामी, कैलास कांबळे, सचिन सूर्यवंशी, सचिन पाटील, संजय ओव्हाळ आदी उपस्थित होते.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते 'सेवा पंधरवडा'ला प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते महात्मा गांधी गांधी यांची यांची जयंती अर्थात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' आयोजित केला आहे. या पंधरवाड्याचा बुधवारी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते शुभारंभ झाला.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सेवा पंधरवडा अंतर्गत पहिल्या टप्प्यात पाणंद आणि शिवार रस्त्यांना क्रमांक देणे, नोंदणी, मोजणी आणि सीमांकनासह वादांचे निराकरण करण्यासाठी रस्ता अदालतीचे आयोजन होईल. दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' उपक्रमांतर्गत सरकारी जमिनीवर घरकुलासाठी कब्जा हक्क, झोपडपट्टी अथवा अतिक्रमण नियमितीकरण आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप केले जाईल. तिसऱ्या टप्प्यात नागरिकांना सुलभ सेवा देण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत. या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली शासन निर्णय पुस्तिका आणि क्यूआर कोडचे यावेळी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

## वंचित बहुजन आघाडी लातूर शहरांमध्ये मुस्लिम युवक यांचा जाहीर पक्ष प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडी पक्ष प्रमुख आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मुस्लिम समाजातील नवयुवक यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश घेतला तसेच मुस्लिम समाजावरती होणाऱ्या अत्याचार होणार मानसिक त्रास NRCC, ट्रिपल तलाक, मज्जिती वरील भोंगा, यावरती सबंध महाराष्ट्रामध्ये व देशांमध्ये मुस्लिम समाजाच्या खांद्याला खांदा लावून त्यांची बाजू धरून सबंध महाराष्ट्रामध्ये आवाज उठवणारे पक्ष म्हणजे वंचित बहुजन आघाडी या पक्षावर व नेतृत्वावर विश्वास ठेवून मुस्लिम समाजातील युवकांचा लातूर शहर येथे पक्षप्रवेश घेण्यात आला तसेच लातूर जिल्हा अध्यक्ष सलीम भाई सय्यद, जिल्हा निरीक्षक सिद्धोधन सावंत साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली व तसेच लातूर शहर अध्यक्ष सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वात पक्षप्रवेश करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्रा युवकांचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे बुलंद आवाज महाराष्ट्र युवक सदस्य अमोल भैया लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सर्व मुस्लिम युवकांचा पक्षप्रवेश घेण्यात आला लातूर शहरातील वार्ड क्रमांक ०७/व लातूर शहरातील वार्ड क्रमांक ०३/ मधील युवकांचा पक्षप्रवेश शेख रहीम, बबलू शेख, सोहेल पठाण,शाहेद शेख, तोहीद बागवान ,फेरोज शेख, इम्राहिम चाचा शेख, मिनाज शेख, मोहम्मद मोहसीन फुलारी, अझहर तांबोळी, शेख बब्बू,राजू शेख, व इतर कार्यकर्ते यांचा पक्षप्रवेश घेण्यात आला याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हा महासचिव एड रोहित सोमवंशी माजी पदाधिकारी खदीर मणियार भाई, जिल्हा उपाध्यक्ष खलील शेख, तसेच लातूर शहर महासचिव आकाश इंगळे, लातूर शहर उपाध्यक्ष मुन्ना पठाण, लातूर शहर सचिव महबूब सय्यद, सचिव सैफ शेख, लातूर आयटी प्रमुख विशाल जगताप, समीर शेख, व इतर सर्व पदाधिकारी कार्यकर्ते या पक्षप्रवेशास उपस्थित होते

## हिंदी के माध्यम से रोजगार की अपार संभावनाएं: प्रा. डॉ. सतीश यादव



**लातूर/प्रतिनिधी :** पत्रकारिता, अनुवाद, विज्ञापन, पर्यटन, फिल्म, रेडिओ, दूरदर्शन, प्रशासन, पॉडकास्ट, ब्लॉग लेखन, मीडिया लेखन, बँक, रेल्वे ,आंतरराष्ट्रीय क्षेत्र अशा विविध क्षेत्रात हिंदीचे ज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. हिंदी के माध्यम से रोजगार की अपार संभावनाएं हैं. असे डॉ. सतीश यादव यांनी आपल्या व्याख्यानात हिंदी भाषेचे महत्व स्पष्ट करताना सांगितले.

लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने ''हिंदी सप्ताह समारंभ'' आयोजित करण्यात आला. या प्रसंगी 'हिंदी के माध्यम से रोजगार के अवसर' या विषयावर प्रा. डॉ. सतीश यादव बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर हे होते. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाणे, आयक्यू एस्सी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रा.संदीपान मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना डॉ.यादव यांनी सांगितले की, हिंदी ही जगातील १३३ हून अधिक विद्यापीठांमध्ये शिकवली जाते. त्यामुळे विद्यार्थी मेहनत, चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर रोजगार मिळवू शकतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले तर सूत्रसंचालन सृष्टी द्विवेदी हिने केले.तसेच पाहुण्याची ओळख पायल माने तर आभार प्रदर्शन मजीद शेख यांनी केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कारही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी विद्यार्थ्यांचा गुण गौरव



**लातूर/प्रतिनिधी :** विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. पवन शिवदास खिचडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी योगेश्वर धाराशिवे, प्रा. किशोर जेवे, प्रा. अमोल कुंभार, प्रा. संगमेश्वर धाराशिवे व श्री. विलास सगरे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी गणेश उत्सवा दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाया विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान देऊन त्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला.

गणपती बनविणे स्पर्धा- गट १ (पूर्व प्राथमिक) : सार्थक श्रीराम दरवडे (प्रथम), वेदांती ज्ञानेश्वर सुडे (द्वितीय), राजवीर बसवराज लाखडीवे (द्वितीय), गट २ (इ. १ ते ३) : माने स्वरूपा समाधान (प्रथम), शिंदे श्रेयश राजेश (द्वितीय), गट ३ (इ. ४ ते ६) : आर्या हनुमंत शेलके (प्रथम), श्रियांश योगेश थेसे (द्वितीय), अद्विका योगेश धाराशिवे (द्वितीय), फॅन्सी ड्रेस स्पर्धा- पूर्व प्राथमिक : हर्षाली घर (प्रथम), वेदांत पुरी (द्वितीय), राजवीर कैल (द्वितीय), प्राथमिक : श्रीजा दंडिमे (प्रथम), गायत्री सूर्यवंशी (द्वितीय), इ. ३ ते ६ : श्रेयश थेसे (प्रथम), हर्ष वाघमारे (प्रथम), अद्विका धाराशिवे (द्वितीय), म्युझिकल चेअर्स स्पर्धा - गट १ (पूर्व प्राथमिक) : राजवीर कैल (प्रथम), गोविंद पवार (द्वितीय), गट २ (इ. १ ते ३) : इंद्रायणी वाघमारे (प्रथम), विकस मुळे (द्वितीय), गट ३ (इ. ४ ते ६) : आर्चित धाराशिवे (प्रथम), वेदांत मुळे (द्वितीय), बॉल गेम्स स्पर्धा- गट १ (पूर्व प्राथमिक) : ऋधन पुरी (प्रथम), सार्थक दरवडे (द्वितीय), गट २ (इ. १ ते ३) : समर्थ गिरम (प्रथम), मिथिलेश चव्हाण (द्वितीय), गट ३ (इ. ४ ते ६) : शौर्य शिर्से (प्रथम), आयुष गिरी (द्वितीय)

बलून गेम्स स्पर्धा- गट २ (इ. १ ते ३) : देवांशी मितकरी (प्रथम), गूंजन गवांदे (द्वितीय), गट ३ (इ. ४ ते ६) : सूर्यवंशी वैदेही (प्रथम), श्रियांश थेसे (द्वितीय), सुंदर हस्ताक्षर स्पर्धा- गट २ (इ. १ ते ३) : रणविजय लोहार (प्रथम), कोमल बोकेडे (द्वितीय), कथा लेखन स्पर्धा- गट ३ (इ. ४ ते ६) : श्रीजा दंडिमे (प्रथम), नागेश सगरे (द्वितीय), अरमान पाटील (तृतीय) या सर्व स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उज्वल केले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

## सहकार मंत्र्यांनी चाकूर कृषी कार्यालयाला दिली अचानक भेट, भेटीत तालुका कृषी अधिकारी यासह अनेक कर्मचारी अनुपस्थित : जिल्हाधिकारी, कृषी उपसंचालकांना दिले कारवाई चे निर्देश



**चाकूर/प्रतिनिधी :** तालुका कृषी कार्यालयाच्या वारंवार तक्रारी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांना तक्रारी प्राप्त होत होत्या. मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी या तक्रारीची दखल घेत चाकूर येथील कृषी कार्यलयाला अचानक भेट दिली असता तालुका कृषी अधिकारी यांच्यासह अनेक कर्मचारी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. यावेळी सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर व कृषी विभागाचे उपसंचालक यांच्याशी भ्रमणध्वनी व संपर्क साधून संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले तसेच कृषी कार्यलय हे दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे तालुक्यातील नागरिकांची गैरसोय होत असून खालच्या मजल्यावर स्थलांतरित करावे असे निर्देश दिले. तसेच तहसीलदार नरसिंग जाधव यांना तालुका कृषी अधिकारी व अन्य कर्मचारी गैरहजर असल्याचा पंचनामा करून वरिष्ठांना कळविण्याचे निर्देश दिले.

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते 'जलप्रलय व्यवस्थापन' पुस्तिकेचे प्रकाशन



**लातूर/प्रतिनिधी ::** जिल्ह्यात निर्माण झालेली पूर परिस्थती हाताळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या सांघिक प्रयत्नांवर आधारित 'जलप्रलय व्यवस्थापन' पुस्तिकेचे प्रकाशन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

लातूर जिल्ह्यातील गेल्या काही दिवसातील पूर परिस्थितीतील अनुभव, प्रशासनाने केलेले नियोजन, विविध विभागांचा समन्वय आणि बचावकार्य याविषयी माहितीचा या पुस्तिकेत समावेश आहे. आपत्तीसमयी प्रशासनाची तत्परता व सामूहिक कार्यपद्धती याचा सविस्तर तपशील यामध्ये मांडण्यात आला आहे.

## सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये मुलांची १३ व मुलींची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांची सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होत असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी :https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करुन विद्यार्थी वसतिगृहासाठी प्रवेश अर्ज भरु शकतात. या वसतिगृहांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी स्थानिक गृहप्रमुख, गृहपाल यांचेकडे संपर्क साधून विहित वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावेत, असे समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.


शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# अमृत संस्थेचा समाज उन्नतीसाठी बालाजी मंदिर सभागृहात होणार मेळावा

धाराशिव, (प्रतिनिधी) - महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेमार्फत समाजउन्नती, शैक्षणिक प्रगती आणि स्वावलंबनाच्या दिशेने एक पाऊल टाकत मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, राज्य समन्वयक दीपक जोशी, उद्योजक दत्ताभाऊ कुलकर्णी, आशिष मोदाणी हे उपस्थित राहणार आहेत.

हा मेळावा शनिवार, २० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता धाराशिव शहरातील मारवाड गल्ली येथील बालाजी मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक चिन्मय कुलकर्णी, जिल्हा उपव्यवस्थापक अजय कुलकर्णी यांनी केले आहे.

या मेळाव्यात विविध लक्षित समाजातील उमेदवारांना विशेष आमंत्रीत करण्यात आले आहे. यामध्ये ब्राह्मण, मारवाडी, कोमटी, ठाकुर, गुजराती, सिंधी, कायस्थ, जाट, बनिया, बंत्स, कम्मा, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राज पुरोहित, नायडू, एलमार आदी समाजातील इच्छुक उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा.

# मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत ध्वज वंदन



धाराशिव, (जिमाका):- मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# येरमाळा बसस्थानकाला परिवहन मंत्री सरनाईक यांची अचानक भेट



धाराशिव, (जिमाका) :- परिवहन मंत्री तथा राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष, धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील येरमाळा बसस्थानकाला आज अचानक भेट देत बसस्थानकाची पाहणी केली. तसेच येथील बस स्थानकावरील प्रवाशांशी संवाद साधला. स्थानकातील स्वच्छतागृह स्वच्छ ठेवावेत.

चौकशी कक्षात वाहतूक नियंत्रकांनी त्यांची नेमून दिलेली सेवा चोख बजवावी, आदी सह विविध सूचना महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केल्या.

# जि.प. प्रशाला व ग्रामपंचायत कार्यालय जळकोट येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण



जळकोट (विजय पिसे)- येथील जि. प. प्रशाला व ग्रामपंचायत कार्यालय जळकोट येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमता जिल्हा परिषद प्रशाला येथे शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष विजय पिसे यांच्या हस्ते सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.व ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली.

त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय येथे यावेळी गावातील करांची बाकी भरलेल्या भाग्यवान कर दाते श्री काशिनाथराव व्यंकट कदम वाडीकर यांना तो ध्वजारोहण करण्याचा मान ग्रामपंचायत कार्यालयाकडून देण्यात आला. प्रथमता त्यांच्या हस्ते सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार घालून करण्यात आले व काशिनाथराव कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. व राष्ट्रगीत गायन करत ध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी जळकोट गावचे सरपंच गजेंद्र कदम, माजी सरपंच अशोकराव भाऊ कदम, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत भाऊ कदम, ग्रामपंचायत सदस्य बसराज कवठे, कल्याणी साखरे, बसवराज कवठे, शिवाजी सुरवसे, संतोष वाघमारे, नामदेव कागे, मेघराज किलजे, भैय्या किलजे, प्रशांत कारले, सुनील लोखंडे, नारायण पटणे, राजेंद्र कारले, माजी सैनिक भरत पाठक, तुकाराम कुंभार, मल्लिकार्जुन कुंभार, रुक्मुद्दीन तांबोळी, दिनकर कदम, जितेंद्र कदम, तसेच ग्रामपंचायत सदस्य, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका मदतनीस, आशाताई, शिक्षकवृंद, पत्रकार बांधव, गावातील युवक ,नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निष्ठावंत दिव्यांग कार्यकर्त्याला शिवसेनेचा सन्मान - नितीन मस्के यांची तुळजापूर शहर संघटकपदी निवड



तुळजापूर (प्रतिनिधी)- शिवसेनेच्या तुळजापूर शहर संघटकपदी दिव्यांग व निष्ठावंत कार्यकर्ता नितीन मस्के यांची निवड करण्यात आली आहे. परिवहन मंत्री व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते मस्के यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली. या नियुक्तीमुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शिवसैनिक म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असलेले नितीन मस्के यांनी आपले अपंगत्व कधीही आडवे येऊ दिले नाही. पक्षाच्या कामात सतत सक्रिय राहून लोकांशी संपर्क साधत त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या या निष्ठावान कार्याची दखल घेत तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव यांनी पक्षश्रेष्ठींना शिफारस केली होती. अखेर त्यांच्या शिफारशीला मान देत शहर संघटकपदाची जबाबदारी मस्के यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली.

या नियुक्तीमुळे सर्व स्तरांवरून कौतुकाचा वर्षाव होत असून अनाथांचे नात ही एकनाथ शिंदे यांची ओळख पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे बोलले जात आहे. दिव्यांग कार्यकर्त्याला पक्षात इतक्या मोठ्या पदावर संधी मिळणे ही ऐतिहासिक बाब असल्याचे मत स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी बोलताना नितीन मस्के म्हणाले,

पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी माझ्यासारख्या दिव्यांग कार्यकर्त्यावर विश्वास दाखवत मला एवढ्या मोठ्या पदाची संधी दिली, याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. आगामी नगर परिषद निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा फडकविल्याशिवाय मी गप्प बसणार नाही, अशी ग्वाही मी देतो.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. मस्के यांच्या नेतृत्वामुळे तुळजापूर शहरात शिवसेनेची संघटना अधिक सक्षम होईल, असा विश्वास पक्षातील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी शिवसेना पक्षाचे उपनेते ज्ञानराज चौगुले,जिल्हा सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते,जिल्हाप्रमुख मोहन पनुरे,तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव,तुळजापूर शहर प्रमुख बापूसाहेब भोसले,उपशहर प्रमुख रमेश चिवचिवे,शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख गणेश नेपते,संजय लोंढे,शहाजी हाके,स्वप्निल सुरवसे,मीनाताई सोमाजी,सौरभ भोसले,मयूर कदम,गणेश पाटील तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळांमध्ये मराठवाडा मुक्ती दिन साजरा



जळकोट (विजय पिसे)-१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन श्री कुलस्वामिनी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा जळकोट ता.तुळजापूर येथे विविध उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रथमत: गावातून प्रभात फेरी काढण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब प्रमुख पाहुणे म्हणून श्री कुलस्वामिनी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय आशा पवार मॅडम माध्यमिक आश्रम शाळेचे ज्येष्ठ शिक्षक नागेंद्र गुरव सर श्री खंडेराव कारले सर, व प्रा.ज्योतीका चव्हाण मॅडम यांची उपस्थिती लाभली.

नंतर शाळेच्या प्रांगणात प्राचार्य श्री संतोष चव्हाण साहेब व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते ध्वजारोहण करुन मानवंदना देण्यात आली. भारताचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त निबंध स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा, घोष वाक्य,प्रश्नमंजुषा व चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. एक पेड मॉं के नाम या अभियान उपक्रमामध्ये प्राचार्य, शिक्षक, व विद्यार्थी समवेत वृक्षरोपण केले.

याप्रसंगी गावातील सन्माननीय मान्यवर सरपंच, उपसरपंच , पोलिस पाटील,आजी माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष व पदाधिकारी,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व पदाधिकारी, चेअरमन व पदाधिकारी,प्रशाला मुख्याध्यापक,प्रतिष्ठित नागरीक,पालक वर्ग,पालक माता भगिनी यांची उपस्थिती लाभली.

शेवटी मान्यवरांचे मार्गदर्शनपर मनोगतानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अप्पासाहेब साबळे सर,देवानंद पांढरे सर व किरण कांबळे सर,किरण ढोले सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

सुत्रसंचालन प्रा.सुरेश कोकाटे सर तर आभार बिळेणसिध्द हक्के सर यांनी मानले.अशा प्रकारे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध उपक्रमानी उत्साहात साजरा करण्यात आला.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्याचा इतिहास विद्यार्थ्यांनी अभ्यासणे गरजेचे - प्राचार्य डॉ. संदीप देशमुख



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्रामावर आधारित ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते,सदर प्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ संदीप देशमुख यांनी वरील प्रतिपादन केले, प्रारंभी डॉ देशमुख यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ ,थोर समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले तसेच शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांना अभिवादन करण्यात आले, ध्वजारोहण कार्यक्रमानंतर महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ मदनसिंग गोलवाल यांच्या पुढाकारातून मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते,ग्रंथ प्रदर्शनामध्ये मराठवाडा मुक्तिसंग्रामवर आधारित ग्रंथ वाचकांसाठी ठेवण्यात आले होते,सदर ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ देशमुख यांनी वरील प्रतिपादन केले, पुढे ते म्हणाले की आपल्या प्रदेशाचा, आपल्या मातिचा इतिहास आपणांस माहीत असणे आवश्यक आहे,१३ सप्टेंबर १९४८ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार मराठवाड्यात निजामांविरुध सैनिक कारवाई झाली होती केवळ ३ दिवसांत हैदराबाद संस्थानातील सर्व महत्वाची केंद्र भारतीय सैन्याच्या ताब्यात आली होती,१७ सप्टेंबर १९४८ रोजी महाराष्ट्रातील ८ जिल्हे स्वतंत्र भारतात सामिल झाली होती,या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ ,अनंत भालेराव यांच्या सह प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेक लोकांचा मोठा सहभाग होता आणि हा इतिहास आजच्या तरुणांना जाणून घेणे गरजेचे असल्याचे मत डॉ देशमुख यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी ग्रंथपाल डॉ मदनसिंग गोलवाल यांच्यासह प्रा. डॉ. बालाजी गुंड, डॉ. केशव क्षीरसागर, प्रा सचिन चव्हाण,प्रा बबन सुर्यवंशी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ मंगेश भोसले यांच्या सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649